लग्न बस्त्याची खास सोय
प्रोप्रा. आर. एन. शिंगवी
महावीर क्लॉथ स्टोअर्स
रेडीमेड | होजिअरी | सुटींग | शर्टींग | साड्या
कोल्हार बु।।, ता. राहाता, जि. अ.नगर.
M. 9860329429, 9822595353

दैनिक
# जनता आवाज

मौल्यवान नात्यांसाठी मौल्यवान दागिने
विश्वासाची परंपरा जपणारे
देडगांवकर सराफ
झेड.के.मार्केट, नागेबाबा बँकेजवळ, कोल्हार बु।।
दीपक ९८९०३९९१९९ | रोहित ९७६६७८७२७४

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ३०१ | बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

**आजचे हवामान**
कमाल 28°C | किमान 16°C

| पेट्रोल | डिझेल |
|---|---|
| 103.50 | 90.03 |

| सोने | चांदी |
|---|---|
| 1,50,126 | 3,03,358 |

# आरक्षणावर 'सर्वोच्च'चा फैसला

## उर्वरित जिल्हा परिषद निवडणुकांचे आज भवितव्य ठरणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्यातील १२ जिल्हा परिषद निवडणुकांची रणधुमाळीला सुरूवात झालेली असताना आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या उर्वरित जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे भवितव्य आज, (दि.२१) ठरणार आहे. आरक्षण संदर्भात सर्वोच्च न्यायालयात आज, बुधवारी सुनावणी होणार आहे. याशिवाय आरक्षण सोडत, एकाचवेळी निवडणुका याबाबत देखील सुनावणी घेतली जाणार आहे. त्यामुळे या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समिती यांच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली. त्यानुसार, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, कोल्हापूर, लातूर, पुणे, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, कोल्हापूर जिल्ह्यात निवडणुका होत आहेत. या जिल्हा परिषदेतील आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या आत असल्याने निवडणुक होत आहे.



अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हा परिषदांचे आरक्षण

उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे व नंदुरबार येथील जिल्हा परिषदांचे आरक्षण ५० टक्क्यांवर आहे. परिणामी, त्यांची निवडणूक दुसऱ्या टप्प्यात होईल. त्यातही आरक्षणाच्या मर्यादा राखण्याबाबत सर्वोच्च न्यायालय काय निकाल देते, त्यावर या निवडणुकांचे भवितव्य अंवलबून आहे.

आरक्षण मर्यादेचा विचार केल्यास नाशिक जिल्हा परिषदेत एकूण ७४ जागा आहेत. यात अनुसूचित जमातीचे (एसटी) ३९ टक्के, इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) २७ टक्के आणि अनुसूचित जाती (एससी) सहा टक्के आरक्षण असे एकूण ७२ टक्क्यांवर आरक्षण पोहोचले. त्यावरून जिल्हा प्रशासनाने १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आरक्षण सोडतही जाहीर केली होती.

मात्र, न्यायालयाने ही मर्यादा ओलांडण्यास मनाई केल्याने या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. यापुढील काळात निवडणूक घेण्यासाठी आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या आत राखण्यासाठी उपाययोजना कराव्या लागतील.

### निकालाकडे इच्छुकांचे लक्ष

सर्वोच्च न्यायालयात आज २१ जानेवारीला अंतिम सुनावणी होत आहे. यात, सर्वोच्च न्यायालय हे आरक्षणासंदर्भातील निर्णयाच्या अधीन राहुन या निवडणूका घेण्यास मान्यता देऊ शकते. दुसरीकडे सर्व जिल्हा परिषदांच्या निवडणुका एकाचवेळी घेण्यात याव्यात यावरही सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. यात नेमका काय निर्णय होतो याकडे इच्छुकांचे लक्ष लागून आहे.

## पानसरे हत्या प्रकरणातील
# आरोपीचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सांगली :** जेष्ठ पुरोगामी विचारवंत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी आणि सनातन संस्थेचा साधक समीर गायकवाड याचा आज सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला.



सांगलीतील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान त्याने अखेरचा श्वास घेतला. चार वर्षांपासून तो जामीनावर बाहेर होता. गायकवाडच्या मृत्यूमुळे पानसरे हत्या प्रकरणाचा खटला आणि पुढील तपासासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समीर गायकवाड सांगलीतील विकास चौक परिसरात आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होता. सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास त्याला अचानक अस्वस्थ वाटू लागले. प्रकृती वेगाने बिघडल्याने कुटुंबीयांनी त्याला तातडीने सांगलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्याने उपचारांना प्रतिसाद दिला नाही आणि मंगळवारी पहाटे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. हृदयविकाराने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज असला, तरी शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे अधिकृत कारण स्पष्ट होईल. ज्येष्ठ विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्यावर १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूरमध्ये (पान ४ वर)

## संमिश्र

### भाजपकडून मित्रपक्ष संपवण्याचा प्रयत्न

**मुंबई :** महायुती सरकारमधील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचा जीव केवळ चोचीत अडकविले असून भाजपने मित्र पक्षांना संपवण्याचा प्रयत्न केला असल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी केला आहे. महापालिका निवडणुकांनंतर आता राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. भास्कर जाधव यांच्या नेतृत्वात आज गुहागर येथील ठाकरे गटाच्या १५ उमेदवारांचे अर्ज भरण्यात आले. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी भाजप व सत्ताधारी महायुतीवर निशाणा साधला.

### भाजप कार्यकर्त्यांचा युती तोडाचा नारा!

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमध्ये आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कीज हॉटेल येथे भाजप आणि शिवसेनेच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली असून, या बैठकीनंतर महायुतीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. यापूर्वी महानगरपालिका निवडणुकीत तब्बल १२ बैठका होऊनही शेवटच्या क्षणी युती तुटली होती, ज्यामध्ये भाजपने मोठे यश मिळवले होते मात्र शिवसेनेला अपेक्षित यश मिळाले नव्हते. आता पुन्हा एकदा दोन्ही पक्षांनी एकत्रित निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला असला, तरी या घोषणेनंतर भाजप कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळत असून, मागील कटू अनुभवांच्या पार्श्वभूमीवर या नव्या युतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### भाजपची वक्तव्य हवेतली पतंगबाजी



**चंद्रपूर :** चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसची सत्ता येणार असून त्यासाठीचे आवश्यक संख्याबळ जमवल्याचे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज स्पष्ट केले. काँग्रेसचे नगरसेवक भाजपच्या संपर्कात ही भाजप नेत्यांची विधान म्हणजे हवेतील पतंगबाजी असल्याचा टोला विजय वडेट्टीवार यांनी लगावला. काँग्रेस पक्षाचा नेता म्हणून चंद्रपुरात काँग्रेसची सत्ता स्थापन करणे आणि तिथला महापौर बसवणे ही आमची प्राथमिकता आहे, त्यासाठी आवश्यक संख्याबळ मिळवल्याचे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.




# काँग्रेस संपवण्याचे काम शिंदेंनी केले

## जयकुमार गोरेंची प्रणिती शिंदेंवर बोचरी टीका



**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोलापूर :** सुशीलकुमार शिंदे यांनी आयुष्यभर कष्ट करून ज्या काँग्रेस पक्षाची उभारणी केली, त्या पक्षाला संपवण्याचे काम प्रणिती शिंदेंनी केले आहे. शिंदे यांनी ज्यांना विश्वासाने सोबत घेतले, त्या कार्यकर्त्यांचे वाटोळे करण्याचे काम प्रणिती शिंदेंनी केले. त्यामुळे मी काँग्रेसचा होतो, हे सांगण्यासाठी मला प्रणिती शिंदेंच्या सर्टिफिकेटची गरज नसल्याचा घणाघात भाजप नेते तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी प्रणिती शिंदे यांच्यावर केला.

प्रणिती शिंदे यांनी जयकुमार गोरे हे काँग्रेसचे कार्यकर्ते होते, अशी आठवण करून दिली होती. यावर प्रत्युत्तर देताना जयकुमार गोरे माध्यमांशी बोलत होते.

सोलापूर महानगरपालिकेत भाजपने ८७ जागा जिंकत स्पष्ट बहुमताचा आकडा पार केला. तर दुसरीकडे सोलापूरमध्ये काँग्रेस पक्षाचे दोन खासदार असूनही पक्षाला (पान ४ वर)

### दूरदृष्टी असलेली व्यक्ती स्वीकृत सदस्य

दरम्यान, भाजपच्या शहाराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी पराभूत उमेदवारांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी दिली जाणार नसल्याचे सांगितले आहे. त्या म्हणाल्या, सोलापूर महापालिका निवडणुकीत पराभूत उमेदवारांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी दिली जाणार नाही. सोलापुरातील भाजपने हा निर्णय घेतला असून पक्षासाठी त्याग केलेल्या आणि शहराच्या विकासासाठी दूरदृष्टी असलेल्या व्यक्तींनाच संधी मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# मुंबई महापौरपदावर तडजोड नकोच!

## दिल्लीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना थेट आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत ऐतिहासिक यश मिळवून मुंबई काबीज केल्यानंतर आता महापौरपदावरून महायुतीमध्ये पेच निर्माण झाला आहे. ८९ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपने आपलाच महापौर बसवण्याचा निर्धार केला असला, तरी बहुमताच्या ११४ या आकड्यासाठी त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या २९ नगरसेवकांवर अवलंबून राहावे लागणार आहे. याच पार्श्वभूमीवर, मुंबईच्या महापौरपदाबाबत कोणतीही



तडजोड करू नका, असा कडक आणि स्पष्ट संदेश दिल्लीतील भाजप पक्षश्रेष्ठींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे.

भाजपला मुंबईत ८९ जागा मिळाल्या आहेत, तर शिंदे गटाला २९ जागांवर यश मिळाले आहे. भाजपला बहुमतासाठी शिंदे गटाची साथ अनिवार्य आहे. हीच राजकीय अडचण लक्षात घेऊन, एकनाथ शिंदे यांनी पहिल्या अडीच वर्षांसाठी शिवसेनेचा महापौर असावा आणि स्थायी समितीसह इतर महत्त्वाच्या समित्यांमध्ये सन्मानजनक वाटा मिळावा, अशी भूमिका घेतल्याचे समजते. यामुळे भाजप आणि शिंदे गटात काहीसा तणाव निर्माण झाला होता. मात्र, आता दिल्लीतील नेतृत्वाने यात (पान ४ वर)

### समन्वयाने तोडगा काढावा

मुंबईच्या महापौरपदावर भाजपच्या हजारो कार्यकर्त्यांच्या भावना जोडलेल्या आहेत. त्यामुळे हा मान भाजपलाच मिळावा यासाठी हायकमांड आग्रही आहे. त्या बदल्यात मुंबई महानगरपालिकेतील इतर महत्त्वाची पदे किंवा राज्यातील अन्य ज्या महापालिकांमध्ये निवडणुका झाल्या आहेत. तिथे शिंदे गट आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीशी चर्चा करून समन्वयाने तोडगा काढावा, असे सुचवण्यात आले आहे.

# सरपंच पदाचा गैरवापर करणे भोवले

## सरपंच पदासह सदस्यत्वही रद्द

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव मतदारसंघातील अंचलगावाच्या सरपंच मंगला खिरडकर यांनी आपल्या सरपंच पदाचा गैरवापर करून स्वतःचा मुलगा घरकुलासाठी पात्र नसतांना देखील बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे घरकुल मंजूर करून घेतले होते. तसेच सदरचे मंजूर घरकुल सरकारी जागेत अतिक्रमण करत बांधले आहे. याबाबत काळे गटाकडून दादासाहेब बनसोडे व कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीची सविस्तर चौकशी केली असता त्यामध्ये अंचलगावच्या सरपंच मंगला खिरडकर या दोषी आढळल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी सरपंच मंगला खिरडकर यांचे सरपंचपदासह ग्रामपंचायत सदस्यत्वही रद्द केले असल्याची माहिती ॲड. एम. यु सय्यद यांनी दिली आहे. त्यामुळे कोल्हे गटाला मोठा झटका बसला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, अंचलगावाच्या कोल्हे गटाच्या सरपंच मंगला खिरडकर यांच्या कागदोपत्री हिंदू धनगर असा जातीचा उल्लेख आहे. परंतु, त्यांच्या मुलाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड येथून हिंदू खाटीक जातीचे बनावट जात प्रमाणपत्र तयार करत सदर घरकुलाचा लाभ तर घेतलाच पण त्याच बरोबर हे घरकुल ग्रामपंचायतच्या अतिक्रमित जागेत बांधले.

या कामी सरपंच मंगला खिरडकर यांनी आपल्या पदाचा गैरवापर करत मुलाला मदत केली होती. त्यामुळे काळे गटाचे दादासाहेब बनसोडे व कार्यकर्त्यांनी समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे २०२१ साली अर्ज दाखल करून सरपंच मंगला खिरडकर यांच्या मुलाने बनावट कागदपत्रांच्या आधारे बनावट जात प्रमाणपत्र मिळविले असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी सर्व कागदपत्रांची पडताळणी करून समाजकल्याण विभागाने सदरचे बनावट प्रमाणपत्र जमा करण्यात येणार असल्याचे तक्रारकर्त्यांना लेखी कळवले होते.

त्यानुसार दादासाहेब बनसोडे यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी यांच्याकडे याबाबत लेखी तक्रार दाखल करत अंचलगावच्या सरपंच मंगला खिरडकर यांचे सरपंचपद रद्द करून त्यांच्यावर कडक कार्यवाही करावी, अशी मागणी केली होती. समाजकल्याण कार्यालयाने दिलेल्या माहितीच्या (पान ४ वर)

# जिल्हा परिषद निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या : नाना पटोले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नागपूर :** मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे काम सरकारकडून सुरू झाले असून उद्या मुंबई केंद्रशासित झाली तर त्यात नावीन्य वाटायला नको. आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस नेते नाना पटोले यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे.

काँग्रेस नेते नाना पटोले यांनी पत्रकार परिषद घेत महापालिका निवडणुकीच्या निकालांवर भाष्य करत सरकारवर टीका केली.



> मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचे काम दिल्लीत बसलेल्या सरकारने सुरू केले आहे. उद्याच्या काळात जर मुंबई केंद्रशासित झाले तर हे नावीन्य ठरणार नाही. त्या पद्धतीचा घाट केंद्र सरकारने घातलेला आहे. आर्टिकल ३ प्रमाणे केंद्र सरकारला त्याचे अधिकार आहेत. महापालिका आपल्या ताब्यात घेऊन आता मुंबईला वेगळे करण्याचे काम त्यांनी सुरु केले आहे. हा आरोप नाही, तर ही वस्तुस्थिती आहे.
>
> **– नाना पटोले, काँग्रेस नेते**

नाना पटोले म्हणाले, देशात हिंदू खतरेमध्ये आहेत असे वल्गना करणाऱ्या या ज्या हिंदुत्ववादी संघटना आहेत, त्यांना आम्ही काय बोलावे, पण या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांच्या प्रतिमेला तोडून महाराष्ट्राचाच नव्हे, महाराष्ट्रातील धनगर समाजाचाच नव्हे, (पान ४ वर)

# सध्या महायुतीत गोंधळाची स्थिती

## माजी मंत्री थोरात; जळगाव, जामोद येथे सातपुडा कृषी प्रदर्शनाचा शुभारंभ



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** भारत हा कृषिप्रधान देश असून शेतकरी आणि शेती या विषयावर अर्थव्यवस्था अवलंबून आहे म्हणून सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे, मात्र महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारमध्ये सध्या गोंधळाची स्थिती असल्याची टीका माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली.

विदर्भातील अमरावती, अकोला, अकोट, शेगाव, जळगाव, जामोद मतदारसंघाचे माजी आ. कृष्णराव इंगळे यांचे अमृत महोत्सवानिमित्त आयोजित सातपुडा कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व शेतकऱ्यांशी संवाद साधतांना ते बोलत होते.

काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात हे सध्या विदर्भाच्या दौऱ्यावर असून अमरावती, बुलढाणा, अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांची त्यांनी संवाद साधला. यावेळी व्यासपीठावर कृष्णराव इंगळे यांच्यासह विदर्भातील विविध काँग्रेस पक्षाचे नेते होते.

माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात (पान ४ वर)

### थोरातांनी ऐतिहासिक निर्णय घेतले

माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळामध्ये महाराष्ट्रातील कृषी उत्पादन सर्वात जास्त होते. शेतकऱ्याचा मुलगा कृषी मंत्री आणि शिक्षण मंत्री हा योगायोग महाराष्ट्रात बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात आला. अनेक ऐतिहासिक निर्णय त्यांनी घेतले. बेस्ट ऑफ फाईव्ह सह एक लाख शेतकऱ्यांची निर्मिती आणि शेती क्षेत्रामध्ये आधुनिकता आणली, असे कृष्णराव इंगळे यांनी सांगितले.

# विहिरीत आढळला तरुणाचा मृतदेह

**जनता आवाज वृत्तसेवा**

**देवळाली प्रवरा :** देवळाली प्रवरा शहरातून बिलोबा वाडीच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या विहिरीत पडलेल्या दुचाकीस्वाराचा मृतदेह सापडला आहे. सुनील बाळासाहेब तुपे (वय ३२, राहणार लाख रोड, देवळाली प्रवरा) असे मृत तरुणाचे नाव आहे. पट्टीचे पोहणारे व नगरपरिषद कर्मचारी यांच्या मदतीने त्यांचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला.



काल, मंगळवारी, सकाळच्या सुमारास बिलोबा वाडी रस्त्यालगत संजय टिक्कल यांच्या विहिरीजवळ एक दुचाकी तसेच दुचाकीस्वाराच्या चप्पल संशयास्पद अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली होती.

नागरिकांनी तातडीने घटनास्थळी गर्दी करत पोलिसांना माहिती दिली. प्राथमिक अंदाजानुसार, दुचाकीस्वार विहिरीत पडल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत होती, त्यानुसार खात्री करण्यासाठी शोध मोहीम हाती घेण्यात आली. पट्टीचे पोहणारे व नगरपरिषद व्यवस्थापन पथक यांच्या मदतीने विहिरीत शोध घेतला, त्यावेळी मृतदेह काढला असता तो सुनील बाळासाहेब तुपे यांचा असल्याचे समजले. (पान ४ वर)

# चिंचोलीच्या साक्षीची इस्रो सहलीसाठी निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील नजीक चिंचोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी साक्षी लक्ष्मण जाधव हिने ग्रामीण भागातून थेट देशाच्या अंतराळ संशोधन क्षेत्रात झेप घेतली आहे.

अहमदनगर जिल्हा परिषद यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इस्रो विशेष निवड परीक्षेत साक्षीची निवड झाली असून दि. १९ जानेवारी रोजी ती पुण्याकडे रवाना झाली.

या निवडीमुळे साक्षीला इस्रो रिसर्च सेंटर, तुंबा (केरळ) येथे होणाऱ्या चार दिवसांच्या शैक्षणिक सहलीत विमानप्रवासाची संधी मिळाली आहे. ग्रामीण भागातील एका प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनीला थेट इस्रोसारख्या नामांकित संस्थेच्या सहलीसाठी निवड मिळणे ही अत्यंत अभिमानाची बाब असून, यामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे व गौरवाचे वातावरण पसरले आहे.



साक्षीच्या यशामागे वर्गशिक्षिका सायगावकर, माजी मुख्याध्यापक निवृत्ती कर्डिले तसेच शाळेच्या संपूर्ण शिक्षकवर्गाचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, मेहनत व प्रेरणा कारणीभूत ठरली आहे.

सहलीसाठी आवश्यक साहित्य प्रदान करताना गटविकास अधिकारी संजय लखवाल व गट शिक्षण अधिकारी कळमकर यांनी विद्यार्थिनीला शुभेच्छा देत तिचा उत्साह वाढवला. साक्षीला सहलीसाठी रवाना करताना मुख्याध्यापक आरगडे हरिभाऊ यांनी शुभेच्छा दिल्या.

# पाणीपुरवठा सुरळीत करा अन्यथा आंदोलन

## नगरसेवकांचा आयुक्तांना इशारा; मनपा प्रभाग क्रमांक १३ व १४ मध्ये पाणीपुरवठा विस्कळीत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहरातील मनपा प्रभाग क्रमांक १३ व १४ मध्ये गेल्या महिन्याभरापासून सुरू असलेल्या पाणीपुरवठा विस्कळीततेमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. कमी दाबाने आणि अवेळी सुटणारा पाणीपुरवठा यामुळे मार्केट यार्ड, माळीवाडा, टिळक रोड, सारसनगर, भवानीनगर, भोसले आखाडा, माणिक नगर, कोठी रस्ता व बुरुडगाव रोड परिसरातील रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



त्यामुळे त्वरित पाणीपुरवठा सुरळीत करा अन्यथा आंदोलन उभारले जाईल, असा इशारा नगरसेवकांनी आयुक्तांना दिला आहे.

नवनिर्वाचित नगरसेवक गणेश भोसले, माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, नगरसेवक सुरेश बनसोडे, माजी नगरसेवक संजय चोपडा व सामाजिक कार्यकर्ते गोरख पडोळे यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देऊन तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

> काही तांत्रिक कारणांमुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून तो शक्य तितक्या लवकर सुरळीत करण्यात येईल. यासाठी पाणीपुरवठा विभागाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.
>
> **– यशवंत डांगे, आयुक्त**

या मागणीदरम्यान नगरसेवकांनी स्पष्ट इशारा दिला की, येत्या आठ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास नागरिकांच्या वतीने महापालिकेत तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला. निवडणुकीच्या काळात नागरिकांकडून पाणीटंचाईबाबत अनेक तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र निवडणूक झाल्यानंतरही स्थितीत बदल न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

# स्पर्धा परीक्षेची तयारी दहावीपासूनच करा

## आ. किरण लहामटे; आदिवासी कृती समितीकडून गुणवंतांचा सन्मान



> आजच्या आधुनिक, स्पर्धात्मक आदिवासी विद्यार्थी एमपीएससीद्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये उत्तुंग यश संपादन करत आहेत. ही अतिशय अभिमानास्पद गोष्ट आहे. या विद्यार्थ्यांनी आपल्या मिळालेल्या संधीचे सोने करून, समाजहित डोळ्यासमोर ठेवून आपला पुढचा प्रवास करावा व येणाऱ्या पिढीला योग्य मार्गदर्शन करावे.
>
> **– प्रा. नितीन तळपाडे**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** आदिवासी समाज जगातील सर्वात जुना असून त्यांना मूळ निवासी समजले जाते. तसेच सहनशील आणि तेव्हढाच प्रामाणिक आहे. जिद्द व चिकाटी असल्यास कोणत्याही शाखेत प्रवेश मिळाला तरी संधीच सोनं करता येते. स्पर्धा परीक्षेची तयारी दहावीपासूनच करावी, असे प्रतिपादन आ. किरण लहामटे यांनी केले.

आदिवासी समाज कृती समिती महाराष्ट्र, शाखा अकोले व माजी विद्यार्थी आश्रम शाळा मवेशी यांचे संयुक्त विद्यमाने ड. देशमुख महाविद्यालय राजूर येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व सरळ सेवा महाराष्ट्र शासन परीक्षेत उत्तीर्ण झालेले गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंधु भांगरे होते. यावेळी प्रा. नितीन तळपाडे, प्रा. डॉ. विजय हीले, आमदार डॉ. किरण लहामटे, रामनाथ भोजने, बी. के. घोडे उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी रमेश हीले, कोंडीराम पोपेरे, नामदेव भांगरे, शिवराम भांडकोळी, विठ्ठल जोशी, बाजीराव वाळेकर यमाजी भांगरे, सिंधू भांगरे, रामभाऊ रोंगटे, निंबा भांगरे, गंगाराम सांगडे, किसन भोजने, सुदाम चपटे, मारुती पडवळे, सुरेश गोडे आदींनी परिश्रम घेतले होते.

# पानोडीत श्रमसंस्कार शिबिरास प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि अश्विन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मांची हिल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय सेवा योजना' विशेष श्रम संस्कार शिबिराचा संगमनेर तालुक्यातील पानोडी येथील हजारवाडी येथे मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. १७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत हे शिबीर चालणार असून, 'शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन' हा या शिबिराचा मुख्य विषय आहे.



> शाश्वत विकासासाठी पाणी अडवणे आणि जिरवणे अत्यंत आवश्यक आहे. युवकांनी पाणलोट क्षेत्रातील बारकावे समजून घेऊन पडीक जमिनीचा विकास कसा करता येईल, यावर लक्ष केंद्रित करावे. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व श्रमसंस्कृती रुजण्यास मदत होईल.
>
> **– विक्रमराजे थोरात**

हजारवाडी येथे या शिबिराचा उद्घाटन सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच गणपत हजारे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच तथा राजहंस दूध संघाचे संचालक विक्रमराजे थोरात, सोसायटीचे चेअरमन बबनराव कराड, किसन हजारे आदी मान्यवर उपस्थित होते. दीपप्रज्वलन आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराची अधिकृत सुरुवात करण्यात आली.

यावेळी सरपंच गणपत हजारे म्हणाले की, विद्यार्थी दशेत असताना सामाजिक कार्याची ओढ लागणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी श्रमदानातून गावाचा कायापालट करू शकतात. हजारवाडी व पानोडी ग्रामपंचायत या शिबिरासाठी सर्वतोपरी सहकार्य करेल.

# शेटेवाडीत मकर संक्रांतीच्या वाणाचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वाळकी :** मांडवगण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शेटेवाडी येथे संक्रांती वाण वाटपानिमित्त महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. हळदी-कुंकू पारंपरिक संस्कृतीचे जतन करणारा सोहळा आहे.

या कार्यक्रमाने महिला एकत्र येऊन आपल्या विचारांची देवाण-घेवाण करत असतात.



अशा कार्यक्रमातून महिला सशक्तीकरणाला दिशा मिळत असते. त्यामुळे महिलांमध्ये सामाजिक बांधिलकी व सामाजिक ऐक्याची भावना निर्माण होण्यास मदत होते.

यावेळी उपस्थित महिलांना वाण वाटप करण्यात आले. तसेच निवृत्त मुख्याध्यापिका आशा शेटे-काकडे यांचा काव्य गायनाचा कार्यक्रम पार पडला. सामाजिक कार्यकर्त्या आरती लोखंडे यांनी स्री शिक्षण व महिलांचे आरोग्य या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करताना आई व शिक्षक हेच मुलांचे उज्वल भवितव्य घडवू शकतात असे सांगितले.यावेळी महिलांसाठी संगीत खुर्ची, मनोरा रचणे, प्रश्नमंजुषा आदी स्पर्धांचे आयोजन करुन विजेत्यांना बक्षिसे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फुर्त सहभाग मिळाला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ज्योती भालसिंग, मिराताई शेटे, अश्विनी घोडके, योगिता शेटे यांनी परिश्रम घेतले.

## बालनाथ पुंड यांचे यांचे अपघाती निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** निमगाव वाघा येथील रहिवासी दिल्लीगेट येथील जगदंब सायबर कॅफेचे संचालक बालनाथ पुंड (वय ३७) यांचे कल्याण रोड येथे अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर निमगाव वाघा फाटा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे वडील, आजी, पत्नी, २ मुली असा परिवार आहे.

# 'आविष्कार'मध्ये डॉ. मगजींनी पटकावले पारितोषिक

**जनता आवाज वृत्तसेवा**

अहिल्यानगर : अहिल्यानगर येथील विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या फिजिओथेरपी महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या पदव्युत्तर विद्यार्थिनी डॉ. तेजल मगजी यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने नाशिक येथे आयोजित केलेल्या विद्यापीठ स्तरीय संशोधन-आविष्कार या प्रतिष्ठित स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले आहे.



तापमान आणि कंपन संवेदनशीलता तपासण्यासाठी त्यांनी एक अभिनव उपकरण तयार केले आहे. रुग्णांमधील संवेदनशीलता कार्याचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी डिझाइन केलेले हे नाविन्यपूर्ण उपकरण, न्यूरो फिजिओथेरपी विभागाच्या प्राध्यापिका आणि विभागप्रमुख डॉ. सुवर्णा गणवीर आणि विभागप्रमुख डॉ. श्याम गणवीर यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली विकसित केले गेले. हा शोध फिजिओथेरपी क्षेत्रातील कार्यक्षम आणि अचूक निदान साधनांची महत्त्वाची गरज पूर्ण करतो. ही ओळख महाविद्यालयाचा संशोधन, नवोपक्रम आणि व्यावहारिक, समस्या निवारक शिक्षणावरील मजबूत भर अधोरेखित करते. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे फिजिओथेरपी महाविद्यालय, जे एमयुएचएसशी संलग्न आहे आणि बॅचलर आणि मास्टर ऑफ फिजिओथेरपी दोन्ही कार्यक्रम देते, विद्यार्थ्यांना आरोग्यसेवेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या उत्कृष्ट संशोधनात सहभागी होण्यास प्रोत्साहित करते. डॉ. तेजल मगजी

> **मान्यवरांकडून डॉ. मगजींचे कौतुक**
>
> डॉ. तेजल मगजी यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल डॉ. विखे पाटील फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, मेडिकल कॉलेज चे संचालक डॉ. अभिजीत दिवटे, प्राचार्य डॉ. श्याम गणवीर, प्राध्यापक आदींनी अभिनंदन केले आहे.

पदव्युत्तर विद्यार्थिनी असुन यांची ही उपलब्धी क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये विद्यार्थी-नेतृत्वाखालील नवोपक्रमाची क्षमता दर्शवते. आम्हाला त्यांच्या समर्पणाचा आणि आमच्या प्रतिष्ठित प्राध्यापकांनी दिलेल्या उत्कृष्ट मार्गदर्शनाचा सार्थ अभिमान आहे, अशी प्रतिक्रिया महाविद्यालयाच्या प्रतिनिधीने व्यक्त केली.

# अशोक आयडियल स्कूलमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** माजी आ. भानुदास मुरकुटे यांच्या नेतृत्वाखाली तसेच अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी मंजुश्री मुरकुटे यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या अशोक आयडियल स्कूल या सीबीएसई स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले.

या स्नेहसंमेलनामध्ये नवरस या संकल्पनेवर आधारित मानवामधील नऊ वेगवेगळ्या भावनांवर आधारित नृत्य नाटिका सादर करण्यात आल्या. हास्यरस, रौद्ररस, करूण रस, शांतीरस, अद्भुत रस, विभत्स्यरस, वीर रस, शृंगार रस, व भयरस इत्यादी भावना विद्यार्थ्यांनी अतिशय सुरेखपणे प्रस्तुत केल्या. तसेच प्रत्येक सादरीकरणातून एक संदेश दिला. यातील वीर रस मधील हिरकणी, सम्राट अशोक, महाराणा प्रताप इत्यादींची वीरगाथा विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरित्या साकारली.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वीरतेचे सादरीकरण. तसेच कपिल शर्मा शो मधील डॉ. मशहूर गुलाटी या व्यक्तिरेखेने कार्यक्रमात विनोदी रंग भरले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंजुश्री मुरकुटे यांनी केले. बक्षीस वितरणाचे सूत्रसंचालन सुनील बागुल, रूपाली देशमुख व वनमाला गरुड यांनी केले.

# डॉ. साठे नाट्यगृह खुले करून सुरु करा

## अस्मिता संघर्ष सेनेची नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपुर :** साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे नाट्यगृहामध्ये अत्यंत अस्वच्छता आहे. त्या ठिकाणी नगरपरिषदेच्या वतीने पार्किंग सुरू आहे. ते नाट्यगृह समाजासाठी व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी खुले करून पुन्हा सुरू करावे, साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची विटंबना थांबवावी, अशी मागणी अस्मिता संघर्ष सेनेने नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.



साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे नाट्यगृह लवकरात लवकर स्वच्छ करून ते सुरू झाले नाही, तर तीव्र आंदोलन समाज बांधवांच्या वतीने करण्यात येईल, असा इशारा भागचंद नवगिरे यांनी दिला आहे.यावेळी सागर भोंडगे, मोहन आव्हाड, रोहन नवगिरे, बाबासाहेब पवार, दीपक भांड, साहिल भांड, प्रवीण खैरनार, विठ्ठल गालफाडे, प्रशांत भोसले, करण आव्हाड, काळूराम राक्षे, कार्तिका आढागळे, विजय सोनवणे, विजय नवगिरे, सोनू पारखे आदी उपस्थित होते

> **नाट्यगृह लवकर सुरु होणार**
>
> साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे नाट्यगृहाची त्वरित स्वच्छता करून लवकरात लवकर ते सुरु करण्यात येईल, असे आश्वासन नगराध्यक्ष करण ससाणे यांनी दिले.

# 'वरदविनायक'मध्ये गणेश याग महोत्सवास प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**प्रवरानगर :** राहाता तालुक्यातील लोणी खुर्द येथील वरदविनायक सेवाधाम उद्यापासून भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्मिक ऊर्जेचे केंद्र ठरणार असून येथे २० जानेवारीपासून गणेश जयंती व गणेश याग महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक व अध्यात्मिक महोत्सव २३ जानेवारी, शुक्रवारपर्यंत भक्तिभावात साजरा होणार असल्याची माहिती सेवाधामचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) यांनी दिली.

वरदविनायक सेवाधाममध्ये गेल्या तेरा वर्षांपासून गणेश याग महोत्सव परंपरेने मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरा केला जात आहे. दरवर्षी या पवित्र उत्सवासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून तसेच उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील हजारो भाविक मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहतात. गणपती बाप्पाच्या कृपेने विघ्नहर्ता, बुद्धिदाता आणि मंगलकर्ता याच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी भाविक या सेवाधामकडे आवर्जून येतात.



यंदाही चार दिवस चालणाऱ्या या महोत्सवात धार्मिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. गणेश याग, काकडा भजन, हरिपाठ, भजन, प्रवचन व कीर्तन अशा विविध कार्यक्रमांमुळे संपूर्ण सेवाधाम परिसर भक्तीमय वातावरणाने भारून जाणार आहे. महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार तसेच वारकरी संप्रदायातील संत-महंतांच्या उपस्थितीमुळे हा महोत्सव अधिकच मंगलमय व प्रेरणादायी ठरणार आहे.

# चंदनापुरी येथील तरुणांची काँग्रेसला सोडचिठ्ठी!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** तालुक्यातील चंदनापुरी गावातील अनेक काँग्रेसच्या तरुण कार्यकर्त्यांनी काँग्रेस सोडचिठ्ठी दिली असून आ. अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे चंदनापुरी परिसरात शिवसेनेला मोठे बळ मिळाले असून तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.



आ. खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात शिवसेनेचे ग्रामपंचायत सदस्य श्याम रहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हरिभाऊ सोन्याबापू रहाणे, सोपान निवृत्ती दुधवडे, पांडुरंग काळे, रामदास दुधवडे, खंडू काळे, रवींद्र काळे, रवींद्र सुनील मेंगाळ, नवनाथ रामनाथ दुधवडे, सागर दुधवडे, दीपक दुधवडे, सचिन काळे, राहुल मधे, विनीत दुधवडे, सुनील काळे, बाळासाहेब काळे, भाऊसाहेब काळे, प्रीतम दुधवडे, विठ्ठल दुधवडे, अजय केदार, विठ्ठल दुधवडे, विकास दुधवडे, लक्ष्मण दुधवडे, निलेश मधे, सचिन दुधवडे, अनिल फोडसे या तरुण काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवसेनेत काम करण्याचा निर्धार व्यक्त करून प्रवेश केला आहे. यावेळी आ. खताळ यांनी सर्व प्रवेश केलेल्या तरुणांचे शिवसेना पक्षाचे भगवे वस्त्र गळ्यात घालून स्वागत केले.

> शिवसेना हा सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी सातत्याने काम करणारा, लोकाभिमुख आणि लढवय्या पक्ष आहे. समाजातील प्रत्येक घटकाचा विकास हाच शिवसेनेचा केंद्रबिंदू असून, तरुणांच्या सक्रिय सहभागामुळे संघटना अधिक सक्षम, मजबूत आणि गतिमान होईल. चंदनापुरीसह संपूर्ण संगमनेर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी, मूलभूत सुविधा, रोजगार, शिक्षण आणि पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शिवसेना कटिबद्ध राहणार आहे.
>
> **– अमोल खताळ, आमदार**

# रस्त्यासाठी गावातील युवक उपोषणावर ठाम

## वारी-हिंगोणी रस्त्याची दुरवस्था; तहसीलदारांना निवेदन

जनता आवाज वृत्तसेवा

**कोपरगाव** : विकासाच्या नावाखाली मोठमोठ्या घोषणा आणि कागदोपत्री योजना मांडल्या जात असल्या, तरी वारी गावातील वास्तव मात्र प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आहे. कोपरगाव तालुक्यातील वारी-हिंगोणी रस्त्याची झालेली दयनीय अवस्था आणि त्याकडे दीर्घकाळ केलेले दुर्लक्ष यामुळे अखेर वारी येथील युवकांनी आंदोलनाचा येथील युवकांनी आंदोलनाचा निर्णय घेतला आहे.



रस्त्यांचे तातडीने डांबरीकरण न झाल्यास शनिवार, दि. २४ जानेवारी रोजी वारी ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याचा इशारा देण्यात आला आहे. या संदर्भात कोपरगावच्या नायब तहसीलदार सातपुते तसेच ग्रामीण पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांना निवेदन देऊन प्रशासनाला आगाऊ कल्पना देण्यात आली आहे. यावेळी माजी सरपंच बद्रीनाथ जाधव, पत्रकार प्रशांत टेके, अनिल गोरे यांच्यासह नानासाहेब शिंदे, बाबासाहेब गोरे, शांताराम जाधव, राजेंद्र गव्हाणे, दादासाहेब चव्हाण, बाळासाहेब गोरे, अरुण जाधव, नानासाहेब गाडगे, सोमनाथ गव्हाणे, दादा जाधव, सागर काथे, साहेबराव चव्हाण, कल्याण टेके, गणेश काथे, राहुल गिरे, अक्षय गाडगे, शुभम गाडगे, निखिल जाधव, सोमेश काचे आदी उपस्थित होते

निवेदनांपुरतीच कार्यवाही न राहता प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याची ठाम भूमिका युवकांनी स्पष्ट केली आहे. वारी येथील प्रभाग क्रमांक ५ मधील वारी-हिंगोणी रस्ता हा परिसरातील शेतकरी, दूध उत्पादक, शालेय विद्यार्थी, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी गावात ये-जा करण्याचा प्रमुख मार्ग आहे. मात्र सद्यस्थितीत या रस्त्याची अवस्था अत्यंत विदारक झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून उघडी खडी सर्वत्र पसरलेली आहे. परिणामी या मार्गावरून प्रवास करणे धोकादायक बनले आहे. विशेष म्हणजे सन १९७२ साली या रस्त्याचे खडीकरण करण्यात आले होते; त्यानंतर आजतागायत रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी साठी कोणतीही कोणतीह ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

### रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू करावे

संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू करावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. अन्यथा या परिसरातील शेकडो युवक उपोषणाला बसणार असून, संबंधित विभागाकडून लेखी स्वरूपात काम सुरू करण्याचा आदेश मिळेपर्यंत उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला आहे.

# संगीत नवनाथ चरित्र कथा उत्साहात

जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीगोंदा** : शहरातील मांडवगण रोड गणपती येथे आनंददायी वातावरणात पहिल्याच वर्षी धर्मनाथ बीजेनिमित्त संगीत नवनाथ चरित्र कथा व पारायण सोहळा करण्यात आला होता. यावेळी पारायण सोहळ्याचे व्यासपीठ चालक सुभाष महाराज आळेकर व कुंडलिक महाराज गाडे यांनी केले तर संगीत चरित्र कथा प्रवक्ते अभिजीत महाराजगिरी यांनी नवनाथ महाराजांच्यावरती विविध कथा आठ दिवस भक्तिमय वातावरणात सादर केल्या.

कथेचे सौजन्य नगरसेवक सुशील कुमार शिंदे यांनी केले तर मंडप सौजन्य नगराध्यक्ष सुनीता खेतमाळीस यांनी दिले. या पारायण सोहळ्यानिमित्त तालुक्यातील व संपूर्ण जिल्ह्यातील राजकीय नेते अधिकारी वर्ग व नाथ भक्त परिवार सहभागी झाला होता. ज्ञानाई वारकरी शिक्षण संस्था आळंदी येथील विकास महाराज अवसरे व त्यांची सर्व टीम यांनीही हरिपाठ केला. सदरील धर्मनाथ बीज निमित्त शेवटी काल्याच्या कीर्तनाने सांगता करण्यात आली.



# भेंडा येथे श्री गणेश जयंती उत्सवाचे आयोजन

जनता आवाज वृत्तसेवा



**कुकाणा** : नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्री गणेश मंदीर, लांडेवाडी येथे श्री गणेश जयंती निमित्ताने श्री गणेश जन्मोत्सव उत्सवाचे आयोजन केले यावेळी सकाळी हभप रामगिरी महाराज येळीकर यांचे जाहीर हरिकीर्तन होणार आहे.

याप्रसंगी राम महाराज झिंजुर्के, हभप सुनिलगिरी महाराज, हभप गणेशानंद महाराज उपस्थितीत राहणार आहे. गणेश भक्त परिवाराच्या वतीन आयोजित या उत्सवाचे हे १३ वे वर्ष आहे. या उत्सवात सोमनाथ बाळासाहेब तांबे यांच्याकडून महाप्रसाद अन्नदान आहे. संतपूजन सेवा बबनराव पवार यांच्याकडे आहे. मंडप डेकोरेशन सेवेसाठी संजय फुलारी व अनिल आरगडे यांचे सहकार्य लाभणार आहे.श्री गणेश जयंती उत्सव निमित्त होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन गणेश भक्त परिवार (लांडेवाडी), ज्ञानेश्वर उद्योग समूह व समस्त ग्रामस्थांनी वतीने केले आहे.

गणेश मंदिराचे बांधकाम सुरू असून बांधकाम अंतिम टप्प्यात असून ,तरी या मंदिर बांधकामासाठी दानशूर व्यक्तींनी व गणेश भक्तांनी मदत करावी, असे आवाहन श्री गणेश भक्त परिवार यांच्याकडून करण्यात आले आहे .

# पाटचाऱ्यांची लवकरात लवकर दुरूस्ती करावी

## अन्यथा छावा संघटनेचा आंदोलनाचा इशारा



जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीरामपूर** : भंडारदरा धरणाचे रब्बी हंगामाचे प्रथम आवर्तन सुरू असून पाटबंधारे विभागाने रब्बी आवर्तन सुरू होण्यापूर्वी सर्व पाटचाऱ्या दुरूस्त करणे गरजेचे होते. परंतु पाटबंधारे विभागाने ते न केल्याने अनेक शेतकऱ्यांचे भरणे टांगले आहेत. या पाटचाऱ्यांची लवकरात लवकर दुरूस्ती करून शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवावा, अन्यथा प्रजासत्ताक दिनी पाटबंधारे कार्यालयात आंदोलन करणार असल्याचा इशारा छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष नितीन पटारे यांनी दिला आहे.

याबाबत पाटबंधारे विभागाचे उपअभियंता यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी अतिवृष्टी झाल्याने अनेक ठिकाणी शेतातील गाळ, माती, दगडधोंडे पाण्यातून वाहत येऊन चारीमध्ये छोटेमोठे भराव तयार झाले आहेत. तसेच अतिपावसाने चारीत गवत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पाटचारीकडे पाटपाणी व्यतिरिक्त इतरवेळी संबंधित विभागाचे लक्ष राहत नाही. पाटात पाणी दिसले की मग जेसीबीचा शोध घेऊन कुठेतरी चारी दुरूस्त करण्याचा केविलवाना प्रयत्न केला जातो. त्यातून प्रत्येक लाभधारक शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहचत नाही. अशीच परिस्थिती सध्या चालू रब्बी हंगामात पहावयास मिळत आहे. शेतकऱ्यांना पाणी मागणी अर्जाची पोहोच दिली जात नाही. त्याचप्रमाणे पाणीपट्टी भरल्यानंतर पोहोच पावती देण्यासाठी दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागतो.

### अद्यापही शेतकरी पाण्यापासून वंचित

७ जानेवारी रोजी सुटलेले आवर्तन बेलपिंपळगाव, कारेगाव, वडाळा या विभागात पोहचले. परंतू त्या ठिकाणी चाऱ्या नादुरूस्त असल्याने अनेक लाभधारक शेतकऱ्यांपर्यंत पाणी गेले नाही. शेतकरी सिंचन शाखेमध्ये चकरा मारतात. ७ नं. अर्ज भरण्यासाठी जातात. तेव्हा त्या सिंचन शाखेमध्ये कोणीही अधिकारी, कर्मचारी उपस्थित नसतो. तसेच पाणी अवर्तन चालू असताना देखील उपअभियंता, पाटकरी कर्मचारी असे कोणीही अधिकारी सिंचन शाखेत भेटत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना अडचणी येतात.

# 'डॉ. कुमार चोथाणी यांचा गौरव करा'



जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीरामपूर** : संपूर्ण महाराष्ट्रात श्रीरामपूरचा नावलौकिक वाढविणारे सुप्रसिद्ध बालरोगतज्ञ देवदूत डॉक्टर कुमार चोथाणी यांच्या कार्याची दखल घेऊन श्रीरामपूर नगरपरिषदेने त्यांचा यथोचित सन्मान करावा, अशी मागणी काँग्रेसचे शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर यांनी केली आहे.

शहराध्यक्ष डावखर यांनी याबाबत नगराध्यक्ष करण ससाणे व मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे. सदर निवेदनात म्हटले आहे की, श्रीरामपूरचे भूषण असणारे डॉ. कुमार चोथानी हे वयाच्या ७५ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. वैद्यकीय क्षेत्रात त्यांचे मुलाचे योगदान असून विशेष करून बालरोग तज्ज्ञ म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात त्यांची ख्याती आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन नगरपरिषदेने डॉ. चोथानी यांचा सन्मान कसा करता येईल याचा विचार करावा. डॉ. कुमार चोथानी हे वयाच्या ७५ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. आज देखील स्वतःच्या तब्येतीची काळजी न करता रुग्ण सेवा करत आहे. त्यांच्या आजवरच्या कार्याची दखल घ्यावी. त्यांचे कार्य आणि नावलौकिक श्रीरामपूरकरांच्या मनात कसा रुजवता येईल हे बघून योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी अण्णासाहेब डावखर यांनी केली आहे.

# 'संजीवनी'च्या परजणेला ३२ लाखांचे पॅकेज

## जपानी भाषेच्या प्रशिक्षणाचा मिळाला थेट लाभ




संजीवनी इंजिनिअरींग महाविद्यालयाच्या इंडस्ट्री इन्स्टिट्युट इंटरॅक्शन विभागाच्या माध्यमातून ए-टू-जे हिरामेकी इंडिया या कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कंपनीच्या 'फास्ट ऑफर इंटरनॅशनल' उपक्रमांतर्गत प्रसाद परजणेला जपानमध्ये वार्षिक ३२ लाख रुपयांचे पॅकेज देऊन नोकरीची संधी देण्यात आली. एका शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर घवघवीत यश संपादन केले. त्यातून संजीवनी शैक्षणीक संकुलाची गुणवत्ता व दूरदृष्टी पून्हा अधोरेखित झाली.

**– अमित कोल्हे,** कार्यकारी विश्वस्त.

जनता आवाज वृत्तसेवा

**कोपगाव:** संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज मधील उद्योगपूरक शिक्षणाला जपानी भाषेची जोड मिळाली कि काय किमया घडू शकते, हे संवत्सर येथील प्रसाद बबनराव परजणे या विद्यार्थ्याने सिध्द करून दाखवीले. जपानमधील नामांकित एसएमसी कॉर्पोरेशन कंपनीने तब्बल ३२ लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज देऊन त्याला नोकरीची संधी दिली. एका शेतकरी कुटूंबातील विद्यार्थ्यांच्या या यशोगाथे मागे संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजने इंडस्ट्री इन्स्टिट्युट इंटरॅक्शन विभागाद्वारे जपानी भाषा प्रशिक्षण हे महत्वाचे कारण आहे, अशी माहिती संस्थेचे कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांनी दिली.

कोल्हे म्हणाले, संजीवनी शैक्षणिक समूहाने दुरदृष्टी ठेवून जपानी भाषा व संस्कृतीचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले. या उपक्रमामुळे आतापर्यंत १५८ हून अधिक विद्यार्थ्यांना जपान मधील विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकऱ्या मिळाल्या आहेत. त्यातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय संधी उपलब्ध होत आहेत. शेतकरी, कष्टकरी व हातावर पोट असलेल्या ग्रामीण भागातील कुटुंबांतील विद्यार्थ्यांना जागतिक व्यासपीठावर काम करण्याची संधी मिळावी, असे स्वप्न संस्थेचे संस्थापक कै. शंकरराव कोल्हे यांनी पाहिले. हे स्वप्न आता प्रत्यक्षात येताना दिसते आहे. संजीवनीच्या विद्यार्थ्यांनी प्रगत देशांमध्ये उद्योग व सेवाक्षेत्रात योगदान द्यावे हा संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांचा दृष्टीकोन आहे. त्या दिशेने संस्थेची वाटचाल सुरू आहे.

# उपअधीक्षकांची लाच घेताना दलाल जाळ्यात

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील शेवगाव येथील भुमी अभिलेख कार्यालयातील उप अधीक्षक अशोक कांगणे यांच्यासाठी २० हजार रुपयांची लाच घेताना दलाल देवेंद्र फुंदे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडून अटक केली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई करत भूमी अभिलेख कार्यालयातील उपअधिक्षक आणि एक खासगी इसमाला २० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे. ही कारवाई १९ जानेवारी २०२६ रोजी शेवगाव तालुक्यात करण्यात आली आहे. तक्रारदार यांच्या नावे असलेल्या शेवगाव येथील सिटी सर्व्हे नंबर ४८९ मधील जमिनीच्या नोंद प्रक्रियेसाठी उपअधिक्षक किरण अशोक कांगणे (वय ५२), पद उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, शेवगाव) यांनी वीस हजार रुपये लाचेची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कामासाठी त्यांनी खासगी इसम देवेंद्र त्रिंबक फुंदे (वय ४०) खाजगी इसम, रा. शेवगाव) याच्या माध्यमातून २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांच्या कडे लेखी तक्रार दाखल केल्यानंतर लाचलुचपत विभागाने विभागाने सापळा लावला. लाच पडताळणी दरम्यान लाचेची मागणी स्पष्ट झाल्यानंतर १९ जानेवारी रोजी ही कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी शेवगाव पोलीस स्टेशनमध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत कलम ७ आणि १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत नाशिक येथील पोलीस निरीक्षक अमोल वालझाडे, पोलीस हवालदार संदीप हांडगे आणि पोलीस शिपाई सुरेश चव्हाण यांचे पथक सहभागी झाले होते.

# सावळीविहीर-पोहेगाव रस्ता राजकीय कचाट्यात!

## खराब रस्त्यामुळे ग्रामस्थांसह साईभक्तांचे हाल

जनता आवाज वृत्तसेवा



**शिर्डी** : राहाता तालुक्याच्या सीमेवरून जाणाऱ्या सावळीविहीर ते पोहेगाव-सोनेवाडी या ८ ते ९ किलोमीटर रस्त्याची गेल्या दोन वर्षांपासून मोठी दुर्दशा झाली आहे. राजकीय जुगलबंदीमुळे रखडलेल्या या कामामुळे ग्रामस्थांसह शिर्डीला येणाऱ्या साईभक्तांना भीषण त्रासाचा सामना करावा लागत असून नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

कुंभमेळ्याच्या धर्तीवर अनेक प्रलंबित रस्ते जलदगतीने पूर्ण होत असताना, सावळीविहीर-सोनेवाडी रस्ता मात्र राजकीय अडथळ्यांमुळे प्रलंबित आहे. विविध तांत्रिक कारणे आणि राजकीय हेवेदावे यामुळे या रस्त्याचे काम दोन वर्षांपासून पूर्ण होऊ शकलेले नाही. या खराब रस्त्यामुळे नगदवाडी, सोनेवाडी, म्हसोबाची वाडी, चांदेकसारे, एंडकी वस्ती आणि सावळीविहीर खुर्द अशा अनेक गावांमधील नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

संबंधित ठेकेदाराकडून अपूर्ण निधी, नोव्हेंबरमधील पाऊस आणि निधीची अडचण अशी कारणे वारंवार पुढे केली जात आहेत. मात्र, या रस्त्याच्या रखडलेल्या कामामुळे सामान्य माणसाच्या सहनशीलतेचा अंत होत आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पायाभूत सुविधांबाबत शासनाचे मोठे दावे असताना हा रस्ता प्रलंबित राहणे हे प्रशासनाचे अपयश असल्याची टीकाही होत आहे.

# जीएसटी कर प्रणाली 'व्यापाराचा समृद्धी महामार्ग'

## समीरकुमार काले; श्रीरामपुरात जीएसटी मार्गदर्शन शिबीर

जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीरामपूर** : अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जसा समृद्धी महामार्ग किंवा नव्याने विकसित होणाऱ्या एक्सप्रेस मार्गावर विनाअडथळा व स्वनियंत्रित वाहतूक व्यवस्था उभारण्यात आली आहे, त्याच धर्तीवर जीएसटी कर प्रणाली विकसित करण्यात आली असून जीएसटीआयएन प्लॅटफॉर्ममुळे व्यापार अधिक पारदर्शक, सुलभ व सुरक्षित झाला आहे, असे प्रतिपादन विक्रिकर न्यायाधिकरणाचे माजी सदस्य समीरकुमार काले यांनी केले.

श्रीरामपूर मर्चंट असोसिएशन, टॅक्स बार असोसिएशन व तालुका सिड्स, पेस्टीसाईडस् ॲण्ड फर्टिलायझर्स डिलर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जीएसटी मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. यावेळी चार्टर्ड अकाउंटंट दिनेश बुरड, आमदार हेमंत ओगले व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, श्रीरामपूर मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष राहुल कोठारी, अनिल लुक्कड, संजय कासलीवाल, नंदू कोठारी, श्रीरामपूर टॅक्स बार असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष बिहाणी, मानसी नाईक, विजय कोळसे, श्रीरामपूर तालुका सीड्स पेस्टिसाइड अँड फर्टीलायझर डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष राहुल उंडे, जेष्ठ पत्रकार रमेश कोठारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

काले म्हणाले की, जीएसटीआयएन ही संपूर्ण देशातील व्यापाराची एकसंध डिजिटल व्यवस्था असून ई-इन्व्हाईसिंग, क्यूआर कोड व आयएमएस प्रणालीमुळे सर्व देयके संगणकीय प्रणालीवर नोंदविली जात आहेत. एकदा डेटा एन्ट्री झाल्यानंतर रिटर्न्समध्ये सर्व माहिती आपोआप (ऑटो पॉप्युलेट) भरली जाते. खरेदीवरील कराची वजावट (आयटीसी) देयकांच्या पडताळणीनंतरच उपलब्ध होत असल्याने चुकीचे किंवा खोटे देयके सादर करणे शक्य राहिलेले नाही. देयके व रिटर्न्स अपलोड होण्यापूर्वीच सर्व व्यवहारांची सत्यता तपासली जात असल्याने पुढे नोटिसा, तपासणी किंवा चौकशीची गरज उरत नाही. त्यामुळे प्रामाणिक करदात्यांचा वेळ अनुपालनामध्ये वाया न जाता ते आपल्या व्यवसायाच्या वाढीकडे अधिक लक्ष देऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

या शिबिरात चार्टर्ड अकाउंटंट दिनेश बुरड यांनी जीएसटी कर प्रणालीबाबत सविस्तर माहिती देत प्रेझेंटेशनद्वारे व्यापारी व कर सल्लागारांच्या शंकांचे निरसन केले.

### ५६ व्या जीएसटी बैठकीत योग्य निर्णय

५६ व्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत घेतलेले निर्णय सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन गरजांचा विचार करून घेण्यात आले आहेत. शेती, आरोग्य व जीवनावश्यक क्षेत्रांना सवलती देण्यात आल्या असून लघु व मध्यम उत्पादकांना व्यवसायवृद्धीसाठी दिलासा देण्यात आला आहे. कर प्रणाली सुलभ करण्यासाठी १२ व २८ टक्के स्लॅब रद्द करून पाच व १८ टक्के असे दोन मुख्य स्लॅब ठेवण्यात आले आहेत.



# संपादकीय

## व्यवस्थेतले उंदीर...

छत्तीसगडमधील कवर्धा जिल्ह्यात सुमारे सात कोटी रुपये किमतीचे २६ हजार क्विंटल धान गायब करण्यात आले. या घटनेने जनता हैराण झाली असली, तरी जिल्ह्याच्या पणन विभागातील अधिकारी या नुकसानीसाठी उंदीर, वाळवी आणि कीटकांना जबाबदार धरत आहेत. २०२४-२५ मध्ये धान खरेदी करण्यात आले होते. हे संपूर्ण प्रकरण २०२४-२५ चे आहे. तेव्हा सरकारने शेतकऱ्यांकडून आधारभूत किमतीवर धान खरेदी केले होते. जिल्ह्यातील दोन प्रमुख साठवणूक केंद्रांवर हे धान साठवण्यात आले होते. दोन्ही केंद्रांवर एकूण सात लाख ९९ हजार क्विंटल धान साठवण्यात आले होते. धान उचलल्यानंतर साठा जुळवला असता, या दोन्ही साठवणूक केंद्रांवर २६ हजार क्विंटल धानाचा तुटवडा आढळून आला. सर्वात मोठी तफावत बाजार चारभाठा साठवणूक केंद्रात आढळून आली. तिथे २२ हजार क्विंटल धान गहाळ असल्याचे आढळून आले. याची किंमत अंदाजे ७ कोटी रुपये होती. या प्रकरणाबाबत बाजार चारभाठा संकलन केंद्राच्या प्रभारीविरुद्ध उच्चस्तरीय तक्रार दाखल करण्यात आली. खरेदी केंद्र अधिकाऱ्यांशी संगनमत करून प्रभारींनी धानाची खोटी आवक-जावक दाखवली. प्राथमिक चौकशीत तक्रारी खऱ्या असल्याचे आढळून आले आणि त्यांना काढून टाकण्यात आले. विभागीय आदेशांनुसार धानाची दोन टक्के कमतरता आढळली, तर संबंधित व्यक्तीला निलंबित करणे, चौकशी करणे आणि नंतर एफआयआर दाखल करणे आवश्यक आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो, की जर उंदीर आणि वाळवी यांनी धान खाल्ले असेल, तर बनावट बिले कोणी तयार केली? बनावट नोंदी कोणी केल्या? सीसीटीव्हीमध्ये छेडछाड कोणी केली? वस्तुत: येथे कामगारांची बनावट उपस्थिती नोंदवण्यात आली. या पद्धतशीर फसवणुकीमुळे सुमारे सात कोटी रुपयांचा आर्थिक घोटाळा झाला. याबाबत अधिकाऱ्यांच्या विधानांमध्ये मोठी तफावत आहे. जिल्हा मार्केटिंग अधिकारी (डीएमओ) अभिषेक मिश्रा यांनी सांगितले, की संकलन केंद्राचे प्रभारी प्रीतेश पांडे यांना त्यांच्या पदावरून काढून टाकण्यात आले. हवामान परिस्थिती आणि उंदीर, वाळवी आणि कीटकांमुळे झालेल्या नुकसानामुळे धान कमी भरल्याचे त्यांनी सांगितले. कवर्धा जिल्ह्यातील परिस्थिती राज्यातील इतर ६५ संकलन केंद्रांपेक्षा चांगली असल्याचा दावाही त्यांनी केला. या केंद्राची ही अवस्था असेल, तर इतर केंद्रांची काय अवस्था असेल, याचा विचार न केलेलाच बरा! दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या सहाय्यक जिल्हा अन्न अधिकाऱ्यांनी सांगितले, की तक्रार गंभीर आहे आणि प्राथमिक तपासात आरोप खरे असल्याचे आढळून आले आहे. बाजार चारभाठा संकलन केंद्राच्या प्रभारींविरुद्ध विविध बाबींवर तक्रार प्राप्त झाली आहे. चौकशीसाठी एक पथक स्थापन करण्यात आले आहे आणि अंतिम अहवाल आल्यानंतर कठोर कारवाई केली जाईल. या प्रकरणामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. कोट्यवधी रुपयांचे धान गायब झाल्याने आणि उंदीर आणि वाळवीवर दोषारोप केल्याने प्रशासकीय यंत्रणा आणि देखरेख यंत्रणेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. चौकशीनंतर या प्रकरणात कोणाला शिक्षा होणार आणि शेतकऱ्यांचे हित कसे भरून काढले जाईल हे पाहणे बाकी आहे. एक उंदीर दररोज १५ ते वीस ग्रॅम धान खातो. अन्य काहीही खायला मिळाले नाही, तरी तो जगतो. धान वर्षभर तिथे होते. २६ हजार क्विंटल धान्य फस्त करण्यासाठी त्या गोदामात दररोज साडेतीन लाख उंदीर यायला हवेत. तेवढी त्या गोदामाची क्षमता आहे का, हा खरा प्रश्न आहे.

गैरप्रकार माणसाने करायचे आणि त्याचे खापर प्राण्यांवर फोडायचे ही विकृती आजची नाही. २०२२ मध्ये वैशाली जिल्ह्यातील गंडक कालव्यावरील एका धरणाचे नुकसान झाले होते. त्या वेळी असे म्हटले जात होते, की उंदीर धरण कुरतडत होते. त्यामुळे ते गळती लागून फुटले आणि गावात पाणी शिरले. जून २०२४ मध्ये सिवानमधील नवादा गावातही अशीच एक घटना घडली. महाराष्ट्रातही तत्कालीन जलसंपदा मंत्री तानाजी सावंत यांनी चिवरे धरण खेकड्यांनी उकरल्यामुळे फुटल्याचा अजब दावा केला होता. काही दिवसांपूर्वी मुंबई-दिल्ली द्रुतगती मार्गाला भगदाड पडण्याचे खापरही उंदरावर फोडण्यात आले होते. अधिकारी उंदरांवर कशाचा दोषारोप करतील याचा भरवसा नसतो. २०१६-१७ मध्ये कैमूर आणि पाटणा येथे दारूबंदीच्या काळात जप्त केलेल्या दारूचा साठा नंतर कमी आढळला. तेव्हा उंदरांवर दारू पिण्याचा आरोप करण्यात आला. विशेष म्हणजे असा आरोप पोलिसांनीच पत्रकार परिषदेत केला. मार्च २०१९ मध्ये पाटण्यातील बोरिंग रोडवरील एका दागिन्यांच्या दुकानातून उंदरांनी हिऱ्यांचे दागिने चोरले. अशा घटना रोखण्यासाठी सरकारने प्रथम यंत्रणेत घुसलेल्या 'उंदरां'चा बंदोबस्त केला पाहिजे. एका रुग्णालयात सलाईनचा साठा कमी आढळला, तर तिथेही उंदरांनी सलाईन प्यायल्याचा दावा केला. मध्य प्रदेशमधील जबलपूर येथे झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या धान्य घोटाळ्यात झालेले सरकारी तिजोरीचे नुकसान भरून काढण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मालमत्तांचा लिलाव करण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला. जबलपूरमध्ये झालेल्या धान खरेदी घोटाळ्यात या व्यक्तींचा सहभाग असल्याचा आरोप आहे. त्यामुळे सरकारचे अंदाजे ४३ कोटी रुपयांचे नुकसान झाले. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून १६ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. धान्य वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांमध्ये स्कूटर, कारचे क्रमांक देण्यात आले. आता हरयाणातही असाच पाच हजार कोटी रुपयांचा धान्य घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता आहे. तिथल्या शेतकरी संघटनांनी त्याविरोधात आंदोलन सुरू केले आहे. म्हणजेच एकुणात, उंदरांवर किंवा अन्य प्राण्यांवर दोषारोपण करून मनुष्यप्राणी काळे धंदे करत आहे. अशा गैरव्यवहारांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे, शिवाय ते ठराविक प्रांत किंवा राज्यापुरते मर्यादीत नाही. म्हणजेच गैरव्यवहाराची ही क्लृप्ती सर्वदूर पसरली आहे. आणि त्याच्या मुळाशी आहे ती पैशांची हाव आणि या प्रकारे अनियमितता झाली तरी ती तपास अधिकाऱ्यांच्या लक्षात येणार नाही, हा विश्वास. याखेरीज, गैरप्रकार उघडकीस आला तरी आपल्याला वाचवणारे कोणी तरी आहे, याचीही खात्री चोर अधिकाऱ्यांना आहे. असा प्रकार सार्वत्रिक होत असल्यामुळे सरकारने थोडे जागे होऊन परिस्थितीवर नियंत्रण ठेवायला हवे.

# इंदूरचे दुसरे रूप

दृष्टीकोन

– डॉ. सुकृत खांडेकर



बरेचदा आपल्या गृहितकांना धक्का बसतो तेव्हा वास्तव मान्य करण्याची तयारी नसते. त्यातल्या त्यात विषय समाजकारण किंवा राजकारणाशी संबंधित असेल तर हमखास धक्का बसतो, पण मत व्यक्त व्हायला वेळ लागतो. असेच काहीसे घडले आहे इंदूर या शहराबाबत. देशातील सर्वाधिक स्वच्छ अशा या शहराने अलिकडेच राष्ट्रीय वृत्तपत्रांमध्ये आणि देशभरात नाव कमावले. त्यामागील कारण मात्र दुर्दैवी होते.

बरेचदा आपल्या गृहितकांना धक्का बसतो तेव्हा वास्तव मान्य करण्याची तयारी नसते. त्यातल्या त्यात विषय समाजकारण किंवा राजकारणाशी संबंधित असेल तर हमखास धक्का बसतो, पण मत व्यक्त व्हायला वेळ लागतो. असेच काहीसे घडले आहे इंदूर या शहराबाबत. देशातील सर्वाधिक स्वच्छ अशा या शहराने अलिकडेच राष्ट्रीय वृत्तपत्रांमध्ये आणि देशभरात नाव कमावले. त्यामागील कारण मात्र दुर्दैवी होते. मध्य प्रदेशमधील इंदूर महानगरातील भागिरथपुरा येथे नव्या वर्षाच्या प्रारंभालाच पिण्याच्या दुषीत पाण्यामुळे मोठ्या संकटाने घाला घातला. देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंदुरला कलंक लागला. सलग आठ वर्षे देशातील स्वच्छ शहर असा केंद्रीय पातळीवरील सन्मान इंदूरला मिळाला. पण पिण्याच्या दुषीत पाण्याने १६ बळी घेतल्याच्या घटनेने त्याला काळीमा फासला गेला. सर्वात स्वच्छ शहर म्हणून देशात गेले आठ वर्षे इंदूरचा गवगवा होतो आहे. गटाराचेच नव्हे तर मलमुत्रमिश्रित पाणी या शहरातील लोक पित होते, त्यातून त्यांचे आरोग्य बिघडले. दुषीत पाण्याने गरीब लोकांचे पोट खराब झाले, आतडीवर गंभीर परिणाम झाला. एवढेच नव्हे, तर मलमुत्रमिश्रित घाण पाणी प्यायल्याने रक्ताभिसरणावर परिणाम झाला. हेच दुषीत गलिच्छ पाणी प्यायल्याने एक हजारपेक्षा जास्त लोकांना उपचारासाठी रुग्णालयामध्ये भरती व्हावे लागले. मध्य प्रदेशमध्ये गेली अनेक वर्षे भाजपाची सत्ता आहे. इंदुरमधेही वर्षानुवर्षे भाजपाचीच सत्ता आहे. यापुर्वी राज्याच्या कुणाही मुख्यमंत्र्यांला दुषीत पाण्याचा पाणीपुरवठा होत असल्याबद्दल मान खाली घालावी लागली नव्हती. गेल्या वर्षी जुलै महिन्यातच भारतातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून इंदुरला आठव्यांदा पुरस्कार मिळाला आणि डिसेंबर महिन्याच्या अखेरीस हे घाणेरडे दुषीत पाणी प्यायले याचा त्यांना त्रास होऊ लागला. कचऱ्याची विल्हेवाट, स्वच्छता मोहीमेत जनतेचा सहभाग तसेच स्वच्छतेसंबंधी अन्य निकषांवर केंद्र सरकारच्या वतीने देशपातळीवर स्वच्छ शहरांची निवड केली जाते.

इंदूर शहरातील जनतेला महिनोनमहिने सांडपाणी पिण्यासाठी दिले जात असताना इंदूरचे प्रशासन, राज्याचे प्रशासन, इंदुरचे आमदार, खासदार, नगरसेवक आणि पालकमंत्री काय करत होते? कोणते निकष तपासून सर्वोत्तम स्वच्छ शहर म्हणून सलग आठव्यांदा या शहराची निवड करण्यात आली? सोळा बळी गेल्यानंतर आणि हजारावर लोक इस्पितळात दाखल दाखल झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येते, हे बेपर्वाईचे लक्षण आहे. इंदूर शहराचा स्वच्छतेचा देखावा आणि वस्तुस्थिती किती भिन्न आहे हेच या घटनेतून देशाला कळून आले. लोकांना दुषीत पाणी मिळते असल्याच्या ढीगभर तक्रारी इंदूरच्या प्रशासनाकडे टेबलावर पडून होत्या, पण त्यावरील धूळ झटकायलाही कोणा नोकरशहांना वेळ मिळाला नाही. प्रशासन ढिम्म असल्यामुळेच शेवटी न्यायालयाला लोकांना स्वच्छ पाणी देण्यात यावे, असा आदेश द्यावा लागला. ज्या शहराला सलग आठ वर्षे स्वच्छतेचा प्रथम क्रमांक मिळतो, त्याच शहरात दुषीत पाणी पिऊन निष्पाप सोळा लोकांचा मृत्यू होतो, यापेक्षा दुर्दैव कोणते असू शकते? भागिरथपुरा परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपवरून जाणाऱ्या सांडपाण्याच्या पाईपमधून अनेक महिने गळती चालू होती आणि ते सांडपाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत होते. तेच पाणी लोक महिनोंमहिने पित होते. ज्या पाण्याने लोक आपली तहान भागवत होते, त्यात मलमुत्र मिसळत असेल तर त्याचा आणखी काय परिणाम होऊ शकतो? ही बाब प्रशासनाला ठाऊक नव्हती का? तर पूर्णपणे ठाऊक होती, मग प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी हात चोळत बसले होते की पान-तंबाखू चघळत वेळ काढत होते?

पिण्याच्या पाण्याचा रंग, चव आणि वास वेगळा असल्याच्या अनेक तक्रारी लोकांनी प्रशासनाकडे केल्या होत्या. पण इंदूर महापालिका प्रशासन, पाणीपुरवठा विभाग आणि आरोग्य विभाग कुंभकर्णासारखा घोरत पडला होता. प्रशासनाला जाग आली तोपर्यंत सोळाजणांचा मृत्य झाला होता. पिण्याच्या पाण्यात सांडपाणी, मलमूत्र कसे गेले? तातडीने पाईपची दुरूस्ती का केली गेली नाही? लोकांना जागृक करण्यासाठी प्रशासनाने काय केले? अशा प्रश्नांचा मिडियामधून मोठा गवगवा झाला की चौकशी समिती नेमली जाते, मृतांच्या वारसांना सरकारी निकषानुसार नुकसानभरपाई देण्याची घोषणा होते, दोन-चार जणांच्या बदल्या होतात, यापलिकडे पुढे काही होत नाही. काही दिवसांनी हा विषय खुंटीवर टांगला जातो. इंदूर हे राज्यातील मोठे शहर आहे. खासदार म्हणून नऊ वेळा इंदूरचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सुमित्रा महाजन या लोकसभा अध्यक्षपदापर्यंत पोहोचल्या. सुरक्षित पर्यावरण आणि स्वच्छ पिण्याचे पाणी मिळणे हा जनतेचा संवैधानिक अधिकार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने एका आदेशात यापुर्वीच म्हटले आहे. मग भोपाळ आणि इंदूरमधील सत्ताधारी नेत्यांना याची कल्पना नाही का? पिण्याचे पाणी म्हणून नागरीकांना विषारी पाणी दिले जात असेल तर दोष कुणाचा? हिंदी भाषिक पट्टयातील राज्यात बेकायदा बांधकामे व अतिक्रमणे हटविण्यासाठी बुलडोझर चालविण्यात येतात मग लोकांना सांडपाणी मिश्रित पाणी पिण्यासाठी दिले जात असेल तर कारवाईचा बुलडोझर कुणावर चालवणार?

भाजपाच्या नेत्या आणि माजी मुख्यमंत्री उमा भारती यांनीही दुषीत पाणी पुरवठा प्रकरणी दोषी असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. दुषीत पाणीपुरवठा हा गुन्हा ठरवून लोकांची हत्या झाली आहे, अशा गुन्ह्याची नोंद करून कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी होत आहे. प्रशानाची बेपर्वाई, ठेकेदारांकडून वसुली, भ्रष्टाचार बेसुमार वाढल्याने लोकांच्या दैनंदिन समस्यांकडे आणि नागरी सुविधा पुरवण्याकडे प्रशासनाला वेळ नसल्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. लोकांचे बळी गेल्यावर इंदुरमधील विषारी पाणीपुरवठा उघडकीस आला, देशातील अन्य शहरांमध्ये असेच चालू असते. सारी यंत्रणा बेपर्वा कारभार आणि भ्रष्टाचाराने पोखरून निघाली आहे. एका पाहणीनुसार एक लाख लोकांच्या मागे पस्तीस लोकांना दुषीत पाणी मिळते. देशातील ८१ टक्के घरात नळाव्दारे पाणी पोचवले जाते, असे कागदोपत्री सांगितले जात असले तरी त्याची दुरूस्ती देखभाल कोण करतोय, त्यात काय सुधारणा करायला हवी, हे सुध्दा समजले पाहिजे.

इंदूरच्या घटनेतून देशातील सर्व राज्यांनी बोध घेतला पाहिजे. नागरीकांना पिण्याचे स्वच्छ पाणी पुरवले जाते आहे का, याचे ऑडिट केले पाहिजे. इंदुरमधील दुषीत पाणीपुरवठा प्रकरणी काहीजणांचे निलंबन झाले, पण ही कारवाई पुरेशी नाही. आपले कर्तव्य बजावताना हलगर्जीपणा करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई केली पाहिजे. नगर विकासमंत्री कैलाश विजयवर्गीस यांच्या अखत्यारीतच पाणीपुरवठा विभाग येतो. ते स्वत: इंदूरमधून निवडून येतात. भाजपाच्या अनेक मोहीमांमध्ये त्यांचे नाव आघाडीवर असते. मग त्यांचे आपल्या मतदारसंघाकडे दुर्लक्ष कसे झाले? इंदूरचे महापौर पुष्पमित्र भार्गव यांची काहीच जबाबदारी नाही का? आपण अवर मुख्य सचिवांना वारंवार सांगूनही कारवाई झाली नाही, असे ते सांगत असतील तर नोकरशहा महापौरांना महत्व देत नाहीत असेच म्हणावे लागेल. अधिकारी लोकप्रतिनिधींचे ऐकत नसतील तर त्यांची प्रशासनावर पकड नाही, हाच अर्थ होतो. मध्य प्रदेशमधील नर्मदेसारख्या पवित्र नदीचे पाणी अनेक ठिकाणी दुषीत होते. त्यामागे कारणे अनेक आहेत, पण समाधानकारक उपाय शोधण्याचे काम गेल्या वीस वर्षात सरकारला जमलेले नाही. राज्यकर्ते आणि नोकरशहांनाच दुषीत पाण्याचे गांभीर्य नसेल तर निष्पाप नागरीकांच्या जीवाशी यापुढेही धोकादायक खेळ चालू राहील.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## पानसरे हत्या प्रकरणातील आरोपीचा मृत्यू

सकाळी मॉर्निंग वॉकवरून परतत असताना अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. या हल्ल्यात पानसरे गंभीर जखमी झाले होते, तर त्यांच्या पत्नी उमाताई पानसरे यांनाही दुखापत झाली होती. उपचारादरम्यान २० फेब्रुवारी २०१५ रोजी गोविंद पानसरे यांचे निधन झाले.

सुरुवातीला या प्रकरणाचा तपास कोल्हापूर एसआयटीकडे होता. मात्र, पानसरे कुटुंबीयांच्या मागणीनंतर मुंबई उच्च न्यायालयाने २०२२ मध्ये हा तपास एटीएसकडे सोपवला. ९ जानेवारी २०२३ रोजी कोल्हापूर सत्र न्यायालयाने समीर गायकवाड, डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, अमोल काळे, शरद कळसकर यांच्यासह १० संशयितांवर हत्येचा कट रचणे आणि हत्या करणे याप्रकरणी आरोप निश्चित केले होते. या प्रकरणातील सर्व १२ संशयितांना सध्या न्यायालयाने जामीन मंजूर केलेला आहे. खटल्याची प्रक्रिया सुरू असतानाच आता मुख्य संशयित समीर गायकवाडचा मृत्यू झाला आहे.

गोविंद पानसरे हे शिवाजी कोण होता? या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक आणि खंदे पुरोगामी नेते होते. त्यांच्या हत्येचा खटला सध्या न्यायालयात सुरू आहे. तपास यंत्रणांच्या मते, समीर गायकवाड हा या संपूर्ण कटातील अत्यंत महत्त्वाचा दुवा होता. त्याच्या माध्यमातून या हत्येमागील मुख्य सूत्रधार आणि इतर आरोपींपर्यंत पोहोचण्याचे मोठे आव्हान यंत्रणांसमोर होते. आता समीरच्या निधनामुळे या प्रकरणातील तपासाची साखळी खंडित होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## काँग्रेस संपवण्याचे काम शिंदेंनी केले

मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. यावरून काँग्रेस नेतृत्वावर टीका होताना दिसत आहे. भाजप नेते तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर बोचरी टीका केली आहे.

ना. गोरे म्हणाले, ज्यावेळी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना त्यांची गरज होती, तेव्हा त्या त्यांना वाऱ्यावर सोडून गेल्या. त्यामुळे दोन नगरसेवक आल्यावर देखील समाधान वाटत आहे. ८७ नगरसेवक आलेल्या भाजपवर त्या टीका करत आहेत. मी बोललो तर त्यांना लागायचे कारण नाही. एवढा मोठा पराभव झाला तर ते स्वीकारायला हवे. पालकमंत्र्यांनी गल्ली बोळात जाऊन पैसे वाटले वगैरे त्यांनी म्हटले, त्यावेळी त्या सन्मानाने बोलल्या होत्या का? तुम्ही दुसऱ्याचा सन्मान करा मग तुमचाही सन्मान होईल, असा पलटवार गोरे यांनी केला.

आपण लोकसभेला कुठे कुठे चर्चा केल्या होत्या हे सांगायला मला भाग पाडू नका. मी संधीसाधू आहे की काय आहे, हे भाजपला चांगले माहिती आहे. मी जिथे आहे तिथे चांगले काम करतो, ताईंनी आत्मपरीक्षण करावे, कशाला दुसऱ्याकडे बोट दाखवता. बघा आपले घर आणि अवस्था काय आहे, दोन नगरसेवक आलेत त्यांना आधी टिकवा, असेही जयकुमार गोरे म्हणाले.

तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपचे कमळ झेंडा फडकवणे हे आमचे उदिष्ट आहे. सांगोल्यात आम्ही आणि शहाजी बापू समविचारी आहोत त्यामुळे आम्ही सोबत लढू, पण शेकापला सोबत घेण्याबाबत खूप चर्चा होत आहेत, परिस्थिती अशी आहे की, आता एक स्थिती आहे आणि दहा मिनिटांनी काय होईल सांगता येत नाही, असे म्हणत युतीबाबत अधिक बोलणे मंत्री जयकुमार गोरेंनी टाळले.

## मुंबई महापौरपदावर तडजोड नकोच!

हस्तक्षेप करत भाजपची भूमिका स्पष्ट केली आहे.

विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीतील भाजप नेतृत्वाचा संदेश देवेंद्र फडणवीस यांना मिळाला आहे. त्यात म्हटले आहे की, ''भाजप हा मुंबईत सर्वात मोठा पक्ष ठरला आहे आणि मोठ्या प्रतीक्षेनंतर हे निर्णायक यश मिळाले आहे. त्यामुळे महापौरपदावर भाजपचाच हक्क कसा आहे, हे मित्रपक्षांना पटवून द्या. हे करताना कोणत्याही प्रकारची कटुता येणार नाही, याची काळजी घ्या.

आता देवेंद्र फडणवीस हे हायकमांडचा हा नो-कॉम्प्रमाईज संदेश एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना कसा पटवून देतात आणि मुंबईच्या महापौरपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## सरपंच पदाचा गैरवापर करणे भोवले

आधारे काळे गटाचे दादासाहेब बनसोडे यांनी ऑक्टोबर २०२५ रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांच्याकडे नव्याने तक्रार दाखल करून सरपंच मंगला खिरडकर यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून नियमबाह्य पद्धतीने आपल्या मुलाला घरकुलाचा लाभ दिल्याचे तसेच अतिक्रमणाच्या जागेवर घरकुल बांधल्याचे पुरावे ॲड. सय्यद यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केले.

सदरच्या तक्रारीची माहिती घेवून सादर केलेल्या कागदपत्रांची व पुराव्याची जिल्हाधिकारी कार्यालयाने सविस्तर चौकशी व पडताळणी केली असता तक्रारकर्ते दादासाहेब बनसोडे यांनी दिलेली माहिती खरी असल्याचे सिद्ध झाल्याने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी मंगला खिरडकर यांचे सरपंचपद व त्यांचे ग्रामपंचायत सदस्यत्वही रद्द करण्याचा निर्णय घेतला असून हा कोल्हे गटाला मोठा धक्का मानला जात आहे.

## विहिरीत आढळला तरुणाचा मृतदेह

दरम्यान, तुपे यांनी आपली जीवनयात्रा का संपवली, याबाबतचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून, पोलीस प्रशासनाकडून पुढील तपास सुरू आहे.

घटनास्थळी पोलीस प्रशासन, देवळाली प्रवरा नगरपालिकेचे नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी, त्याचबरोबर स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषद निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या : नाना पटोले

तर संपूर्ण भारत देशातल्या हिंदूंचा अपमान करण्याचे पाप या मोदी आणि योगी सरकारने केले आहे. ही आमची भूमिका आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीवर भाष्य करताना नाना पटोले म्हणाले, मतदार यादीत घोळ झाला होता आणि म्हणून आम्ही निवडणूक आयोगाला सांगितले होते की मतदार याद्या पारदर्शक करावी, जी शाई लावण्यात आली ती कशी पुसली जाते ते तुमच्या माध्यमातून पाहिले आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे ईव्हीएमवर आता लोकांचा विश्वास राहिलेला नाही.

त्यामुळे मतदान करायला जायचेच कशाला, हा जो अविश्वास मतदान प्रक्रियेवर जो झाला आहे त्यामुळे अनेक राज्यांमध्ये बॅलेटवर निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे आता जिल्हा परिषदेच्या निवडणुका ज्या आहेत, त्या निवडणुका बॅलेटवर घेण्यात याव्यात, अशी मागणी आम्ही निवडणूक आयोगाकडे आणि राज्य सरकारकडे केली आहे. तसेच लोकांमध्ये जो अविश्वास निर्माण झाला आहे तो राज्य निवडणूक आयोगाने दूर करावा, अशी आमची मागणी आहे.

## सद्या महायुतीत गोंधळाची स्थिती

म्हणाले की, कृष्णराव इंगळे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त होत असलेल्या कृषी प्रदर्शनातून शेतकऱ्यांना नक्कीच नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळणार आहे. दहा एकर परिसरामध्ये उभारलेल्या या कृषी प्रदर्शनातून प्रात्यक्षिके, शेती, योग्य फळे, भाजीपाला, वनौषधी, फुल शेती, व्यावसायिक व उपयुक्त साधनांची दालने यामुळे शेतकऱ्यांना या क्षेत्रातील बदलांची माहिती मिळणार आहे.

राज्यातील सर्व शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी अशी मागणी केली. याचबरोबर राज्यामधील महायुती सरकारमध्ये सध्या गोंधळाची स्थिती असून भाजपच्या खेळीमुळे राज्याच्या राजकारणाचे मोठे नुकसान होत असल्याची टीका त्यांनी केली. यामुळे गटतट वाढले असून असे राजकारण राज्यासाठी दुर्दैवी असल्याचे ते म्हणाले.

यावेळी अमरावतीमध्ये माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी मंत्री सुनील केदार यांच्यासह विविध पक्षाचे नेते व पदाधिकारी उपस्थित होते. ते शेगाव येथे श्री संत गजानन महाराज देवस्थानच्या वतीने मुख्य मंदिर परिसरात लोकनेते बाळासाहेब थोरात यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

## उद्या कर्जत येथे 'जागेवर निवड संधी' उपक्रमाचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी 'जागेवर निवड संधी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत दादा पाटील महाविद्यालय, कर्जत येथे होणार आहे. या उपक्रमांतर्गत इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी पूर्ण करून प्रत्यक्ष उपस्थित राहावे व रोजगाराच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

या उपक्रमात चैतन्य इंडिया फिन क्रेडिट प्रा.लि. (कर्जत), रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह अर्बन क्रेडिट लि., संत नागेबाबा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी (अहिल्यानगर), महालक्ष्मी ऑटोमोबाईल्स (कर्जत) व प्रेस्टिनपिक टेक्नॉलॉजी (कर्जत) या पाच खाजगी आस्थापना सहभागी होणार आहेत. उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाणार आहे. आयटीआय, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी जागेवरच नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.


## जाहिर प्रगटन

(फक्त सभासदांसाठी)

पाथर्डी तालुक्यातील खालील क वर्गातील एका सहकारी पतसंस्थेच्या सन २०२५-२६ ते २०३०-३१ कालावधीसाठी संचालक मंडळाच्या निवडणुकीचा कार्यक्रम मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पाथर्डी आणि संबंधित संस्थेच्या नोटीस बोर्डावर दिनांक २२/०१/२०२६ रोजी सकाळी ११ वा. प्रसिद्ध करण्यात येणार आहे तरी संबंधित संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १) | लोकमान्य ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. तिसगाव ता. पाथर्डी | वाय.एस. शेळके, सहाय्यक सहकार अधिकारी, पाथर्डी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पाथर्डी यांचे कार्यालय पाथर्डी, नाथनगर, नगर-पाथर्डी, रोड |

**जी. एम. नांगरे**
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. पाथर्डी, जि.अ.नगर

## सायटेशन नोटीस

प्रो.फी. जमा.रु. दि. १९/०१/२०२६
पान नं चौ. अ.नं. २००/२०२५

**पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात**

**अर्जदार : श्री. पोपट परसराम राठोड, रा. तोंडोळी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर**
**सामनेवाला : ग्रामपंचायत कार्यालय तोंडोळी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर**

सदर अर्जदार हा मौजे तोंडोळी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर येथील रहिवाशी आहे. सदर अर्जदार यांचा मुलगा नामे साई पोपट राठोडचा जन्म मौजे तोंडोळी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर येथे २१-०७-२०११ रोजी झालेला आहे. त्यानंतर जन्म नोंदणीबाबत ग्रामपंचायत कार्यालय तोंडोळी येथे कळविले होते. परंतु ग्रामपंचायत कार्यालय तोंडोळी यांचे कार्यालयात जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे मुलगा नामे साई पोपट राठोडचा जन्म नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळू शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजनेकामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचा मुलगा नामे साई पोपट राठोडच्या जन्म दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय तोंडोळी, ता. पाथर्डी येथील जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवून तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार यांनी ग्रामपंचायत तोंडोळी, ता. पाथर्डी येथे जावून जन्म प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता जन्माची नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्माची नोंद नसलेबाबत १०-११-२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्माच्या १ वर्षाच्या आतमध्ये जन्म नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत कार्यालय तोंडोळी, ता. पाथर्डी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थतीमध्ये सदर अर्जदार यांचे जन्म नोंद जन्म रजिस्टरला होणे न्यायाचे व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदारास त्यांचे मुलगा नामे साई पोपट राठोडच्या जन्म नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास जन्म नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दिनांक १९/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे हुकुमावरुन.

शिक्का

**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी पाथर्डी**

# नगर-मनमाड महामार्गावर वाहतूक कोंडी

## डॉ. सुजय विखे पाटील ॲक्शन मोडवर; पोलिस व ठेकेदाराला सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : नगर-मनमाड महामार्गावर होणाऱ्या कोंडीवर युवानेते डॉ. सुजय विखे पाटील चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसत आहे. रविवारी दुपारी त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह रस्त्यावर उतरून वाहतूक सुरळीत करीत पोलिस प्रशासनाला सुचना केली होती. काल सोमवारी पुन्हा ते रात्री रस्त्यावर उतरले. त्यांनी ठप्प झालेली वाहतूक सुरळीत केली. या गंभीर परिस्थितीची दखल घेत डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रशासन व संबंधित ठेकेदाराला तातडीच्या उपाययोजना करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.



सोमवारी रात्री सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहुरीत प्रत्यक्ष उपस्थित राहून नगर- मनमाड मार्गावरील वाहतूक व्यवस्थेचा सखोल आढावा घेतला. यावेळी त्यांनी रस्त्यावर थांबून नागरिकांशी संवाद साधत परिस्थितीची माहिती घेतली तसेच संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना दिल्या.

मागील काही दिवसांपासून वाहतूक कोंडीमुळे राहुरीकरांना सहन करावा लागलेल्या त्रासाबद्दल त्यांनी मनापासून दिलगिरी व्यक्त करत, ''जनतेचा विश्वास हीच माझी खरी ताकद आहे. केवळ फोटो-व्हिडिओपुरते काम न करता प्रत्यक्ष प्रश्न सुटले पाहिजेत, हीच माझी भूमिका आहे,'' असे ठामपणे सांगितले. यावेळी देवळाली प्रवरा येथील नगरसेवक ऋषभ लोढा, अक्षय तनपुरे, मनोज गव्हाणे, महेश गायकवाड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

जिथे ट्रॅफिक जाम आढळेल, तिथे आमचे कार्यकर्ते स्वतः पुढाकार घेऊन नियोजन करतील.फक्त एकदा येऊन फोटो काढून लोकांना न्याय मिळाला नाही, तर लोकांचा विश्वास संपतो याची मला पूर्ण जाणीव आहे.आज केवळ एका तासाचा अपवाद वगळता कुठेही वाहतूक ठप्प नव्हती. मागील काही दिवसांत झालेल्या त्रासाबद्दल डॉ. विखे यांनी राहुरीकरांची माफीही मागितली.

> ''मी सगळ्यांना विश्वासात घेऊन काम करणारा माणूस आहे. निष्ठावान व शिस्तबद्ध कार्यकर्त्यांची साथ मला लाभली, हे माझं भाग्य आहे. आमचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून आंदोलन करत नाहीत, तर नेत्याने दिलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करतात. आज त्यांनी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रत्यक्ष मदत केली.
>
> **-डॉ. सुजय विखे पाटील**

## डॉ. भालसिंग यांचा गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : ग्रामीण व शहरी भागातील आरोग्यसेवेला अर्धशतकाहून अधिक काळ समर्पित योगदान देणारे ज्येष्ठ शल्यचिकित्सक डॉ. आसाराम भालसिंग (रा. मुळगाव, वाघोली ता. शेवगाव) यांचा ५० वर्षांच्या यशस्वी शस्त्रक्रियांच्या कारकिर्दीनिमित्त भंडारी हॉस्पिटल, पाथर्डी येथे सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

डॉ. भालसिंग यांनी आजवर सुमारे एक लाख ४६ हजारांहून अधिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या असून, वैद्यकीय क्षेत्रातील हा एक दुर्मिळ आणि प्रेरणादायी विक्रम मानला जात आहे. त्यांनी आपले एमबीबीएस व एम.एस. (सर्जरी) शिक्षण बी.जे. मेडिकल कॉलेज व ससून रुग्णालय, पुणे येथे पूर्ण केले. सन १९८८ ते १९९५ या कालावधीत त्यांनी पाथर्डी येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक म्हणून अत्यंत उत्कृष्ट व लोकाभिमुख कार्य केले.

## गोगलगाव ग्रामपंचातीचा अभियानात सहभाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान स्पर्धेसाठी गोगलगाव ग्रामपंचायतीने सहभाग घेतलेला आहे. या अभियान अंतर्गत मुख्य घटकांवर झालेल्या कामाचे मुख्यमंत्री कार्यालयाकडून राज्यस्तरीय चित्रीकरण गटविकास अधिकारी संजय लखवाल यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक गटविकास अधिकारी बाळासाहेब कासार यांच्या उपस्थितीत करण्यात आलेला आहे.

गावात अभियानाची तयारी करण्यास सुरुवात झाली. ग्रामपंचायतीने प्रशासक गोविंदराव मते व ग्रामपंचायत अधिकारी बापूसाहेब राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीने विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. या अभियानातील मुख्य सात घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामपंचायतीने विविध उपक्रमांची यशस्वी सुरुवात केलेली आहे. यात प्रामुख्याने सुशासन युक्त गाव, गाव पातळीवरील संस्था समक्षमीकरण, आदी गोष्टी करण्यात आलेली आहे.

### शासकीय दाखल्यांचे वितरण

या अभियान कालावधीमध्ये यापुढेही ग्रामपंचायत पातळीवर असेच कामकाज सातत्यपूर्ण सुरू ठेवावे, असे आवाहन सहाय्यक गटविकास अधिकारी बाळासाहेब कासार यांनी केले. यावेळी कासार यांच्या उपस्थितीत महिला बचत गटांच्या सदस्यांनी सुरू केलेल्या व्यवसायास भेटी देण्यात आल्या. तसेच यावेळी महिलांची सभा, आरोग्य तपासणी शिबिर, स्वच्छता अभियान, सुदामराव मते पाटील माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थ्यांना ग्रामपंचायतीच्या आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून शासकीय दाखल्यांचे वितरण करण्यात आलेले

## वीरगावात बिबट्या जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : तालुक्यातील चौरगाव येथील शिवारात वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात रविवारी (१८ जानेवारी) बिबट्या जेरबंद झाला.

वीरगाव, डोंगरगाव, हिवरगाव, देवठाण, पिंपळगाव निपाणी, गणोरे या आढळा मध्यम प्रकल्पाखालील परिसरातून बिबट्यांनी उच्छाद मांडून शेतमजूर, महिला, विद्यार्थ्यांसह, शिक्षक व शेतकऱ्यांच्या नाकीनऊ आणले आहे. गेल्या कित्येक दिवसांपासून वीरगाव व परिसरातून प्रचंड दहशत पसरवणारा हा बिबट्या पिंजऱ्याभोवती फिरत होता. पण जेरबंद मात्र होत नव्हता. रविवारी तो अखेर पिंजऱ्यात अडकला. आता त्याच्या मुक्कामाची व्यवस्था देवठाण येथील वनरोपवाटिकेत करण्यात आली आहे.

आधीच देवठाण येथील वनरोपवाटिकेत दहा बिबटे ठेवण्यात आले आहेत. वीरगाव येथील भरत वाकचौरे व त्यांच्या घराशेजारीच राहणारे ज्ञानेश्वर वाकचौरे यांनी पिंजऱ्यात एक बिबट्या जेरबंद झाल्याचे वनविभागाचे कर्मचारी भाळासाहेब थोरात यांना माहिती दिली. वीरगाव व परिसरातून बिबट्यांच्या संख्येत मोठी वाढ झालेली दिसून येते. सध्या उस तोडणी हंगाम सुरू आहे. यामुळे परिसरातून उसाचे क्षेत्र वेगाने कमी होत आहे. परिणामी त्यामुळे बिबट्यांचे लपन कमी होत चाललेल आहे. एक बिबट्या जेरबंद झाला असला तरीपण या भागात अजूनही अनेक बिबटे मुक्त संचार करताना दिसतात. त्यामुळे कर विभागाने उर्वरित बिबट्यांना पिंजऱ्यात जेरबंद करण्याची पुरेशी उपाययोजना करावी, अशी मागणी थोरात यांनी केली आहे.

## विद्यार्थ्यांनो नवीन संकल्पना आत्मसात करा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : आपल्या मनावर ताबा ठेवणे आवश्यक आहे. जे काही कराल ते उत्तम करा. सद्यस्थितीत औद्योगिक क्षेत्रात सातत्याने बदल होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या काळात सातत्यपूर्ण शिक्षण घेऊन नवीन संकल्पना आत्मसात कराव्यात, असे आवाहन मिलेनियम प्रायव्हेट लिमिटेड सिन्नर या कंपनीचे चीफ जनरल मॅनेजर सतीश नेहे यांनी केले.



वीरगाव येथील आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडीकल एज्युकेशन ट्रस्टच्या पॉलिटेक्निक कॉलेज व मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित औद्योगिक क्षेत्रातील सद्यस्थिती या विषयावरील व्याख्यानात नेहे बोलत होते.

### समाजात ज्ञानी लोकांना मानसन्मान

इंडस्ट्रीतील परफॉर्मन्स हेच उद्याचे भविष्य आहे. हा बदल विद्यार्थ्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. यात कमी पडलो तर आपल्याला कधीही घरी जावे लागेल, ही मानसिकता ठेवावी लागेल. व्यवसाय सुरू करण्यापूर्वी नोकरीतील अनुभव आवश्यक आहे. आपला अभ्यास असा असावा की ५० वर्षानंतरही विचारले तरी प्रश्नांची उत्तर देता आली पाहिजेत. आज ज्ञानी लोकांना मानसन्मान असल्याचे सतीश नेहे यांनी सांगितले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. अनिल रहाणे होते. व्यासपीठावर विभागप्रमुख अक्षय रहाणे, फार्मसीच्या प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, विद्याचंद्र सातपुते उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक समन्वयक विद्याचंद्र सातपुते यांनी केले. पाहुण्यांचा परिचय पायल गोडे या विद्यार्थीनीने करून दिला.

## पालिकेच्या विषय समित्यांच्या निवडी जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी नगरपालिका स्थायी समिती, शिक्षण मंडळ व महिला बालकल्याण समितीच्या निवडणूक आज पार पडली. तहसीलदार अमित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सभेत या निवडी पार पडल्या. सभा शांततेत व खेळीमेळीच्या वातावरणात झाली.

**स्थायी समिती-** भाऊसाहेब छबुराव मोरे, गजानन भागवत सातभाई (सभापती, शिक्षण समिती), स्मिता भारत भुजाडी (सभापती -महिला व बालकल्याण समिती) यांची निवड झाली तर सदस्यपदी हर्ष अरुण तनपुरे, प्रशांत विजय डौले, सोन्याबापु वसंत जगधने, प्रदीप नानासाहेब भुजाडी, सिंधू सुभाष डावखर यांची निवड झाली.

**शिक्षण समिती-** गजानन भागवत सातभाई, सभापती, केतन दशरथ पोपळघट, प्रतीक रावसाहेब तनपुरे, बबन कोंडीराम गुलदगड, प्रसन्ना राजेंद्र वराळे. **महिला व बालकल्याण समिती-** स्मिता भारत भुजाडी, संगीता शहाजी जाधव, वृषाली नंदकुमार तनपुरे, आस्मा आरिफ शेख, प्रियंका अमोल काशीद, मनीषा सचिन भोंगळ यांची निवड करण्यात आली.

या निवडीप्रसंगी मुख्याधिकारी अभिजीत हराळेंसह सर्व नगरसेवक हजर होते. महिला बालकल्याण समिती सभापती व सदस्यांचा ज्येष्ठ नगरसेविका डॉ. उषाताई तनपुरे यांनी सत्कार केले.

## मंत्री विखे पाटलांनी घेतला विद्यार्थ्यांचा तास

### बेलापूर येथील एज्युकेशन सोसायटीचा पारितोषिक वितरण समारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : डॉ.सी.व्ही रामन् कोण होते, विक्रम साराभाई यांनी कोणत्या संस्थेची स्थापना केली. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना कोणत्या उपाधीने ओळ-खले जातात, अंतराळातील मोहीमा कोणी यशस्वी केल्या असे प्रश्न विचारून जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांचा तास घेतला.



बेलापूर येथील एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमात मंत्री विखे पाटील यांनी भाषणाला फाटा देत व्यासपीठावरून थेट विद्यार्थ्यांशी प्रश्न उतराच्या रुपाने संवाद साधला.

मंत्री विखे पाटील यांनी दे-शाने यशस्वी केलेल्या अंतराळ मोहीमेच्या संदर्भात विद्यार्थ्यांना माहीती दिली.ऑपरेशन सिंदूर पासून ते अगदी अलिकडेच यशस्वी झालेल्या बाहुबली या यशस्वी मोहीमेबद्दल प्रश्न त्यांनी शिक्षकांनाही विचारले.

### घोकमपट्टीच्या शिक्षणाचे दिवस संपले

आपल्या देशाला स्वातंत्र्य चळवळीचा मोठा इतिहास आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाने वैज्ञानिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळेच अमुलाग्र बदल आपल्याला पाहायला मिळत आहे. मात्र हे ज्ञान विद्यार्थ्यांना पुस्तकात मिळणार नाही. कारण शालेय अभ्याक्रमाची चौकट ठरलेली आहे. घोकमपट्टीच्या शिक्षणाचे दिवस आता संपले आहेत. देशात होत असलेल्या बदलाचे ज्ञान विद्यार्थ्यांना देण्याची जबाबदारी संस्थाचालक आणि शिक्षकांवर असल्याची जाणीव त्यांनी करून दिली.

## सभापतींच्या निवडी झाल्या बिनविरोध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियमानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी नगरपरिषदेच्या विविध विषय समित्यांच्या सभापतींच्या नुकत्याच पार पडलेल्या विशेषसभेमध्ये निवड करण्यात आल्या.

शिर्डी नगर परिषदेच्या सर्व नगरसेवकांची जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये पिठासन आधिकारी माणिकराव आहेर यांच्या अध्यक्षतेखाली नगरपरिषदेच्या सभागृहात सर्व नगरसेवकांची विशेष सभा घेण्यात आली. या विशेष सभेमध्ये या विषय समित्यांच्या सभापतींच्या बिनविरोध निवड करण्यात आल्या. त्यामध्ये शिर्डी नगरपरिषदेच्या नियोजन समितीच्या अध्यक्षपदी अभयराजे शेळके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापती अरविंद आप्पा सुखदेव कोते यांची तर स्वच्छता व आरोग्य सभापतीपदी दीपक रमेश गोंदकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. महिला बालकल्याण समितीच्या सभापतीपदी सुनीता वसंत गोंदकर तर पाणीपुरवठा सभापतीपदी कोमल किरण बोराडे या महिला नगरसेवकांची सभापती म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. शिर्डी नगरपालिकेच्या नगराध्यक्ष सजयश्रीताई थोरात यांनी सर्व महिला सभापतींचा तर पिठासन आधिकारी माणिकराव आहेर यांनी सर्व पुरुष नवनिर्वाचित सभापतींचा सत्कार केला.

## संगमनेरात वाळू तस्करांचा नंगानाच सुरूच

### सोशल मीडियावर रील बनवत प्रशासनाला दिले आव्हान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यात दहशत दडपशाही बरोबर तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली असून आता वाळू तस्करांनी राजरोसपणे वाळू उपसा करून रिल्स बनवत स्वतः ची जाहिरात करून एक प्रकारे त्यांनी प्रशासनाला आव्हान दिले आहे. संगमनेर तालुक्यात वाळू तस्करांनी खुलेआम नंगानाच सुरू केला आहे.



संगमनेर तालुका हा शांत संयमी तालुका म्हणून ओळखला जातो मात्र मागील एक वर्षापासून संगमनेर मध्ये अंमली पदार्थांची तस्करी याचबरोबर गुंडागर्दी दहशत आणि वाळू तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पिंपरणे परिसरामध्ये प्रवरा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात वाळू काढले जात असून याकडे प्रशासनाने डोळेझाक केली आहे.

वाळू तस्करांची मुजोरी इतकी वाढली आहे. किती सोशल मीडियावर रील बनवून टाकत आहे. यातून दहशत निर्माण करणे प्रशासनावर धाक निर्माण करणे हा त्यांचा उद्देश असून आमची कुणीही काही करू शकत नाही हा संदेशही ते देत आहे. या तस्करांना स्थानिक लोकप्रतिनिधी पालकमंत्री प्रशासन यांचा सर्वांचा पाठिंबा असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे अन्यथा चोरीचा धंदा आता स्टाईल म्हणून करताना हे वाळू तस्कर थेट सोशल मीडियावर आपली प्रसिद्धी करत आहे.

पोलीस प्रशासन महसूल प्रशासन आमचे काहीही करू शकत नाही अशी थेट धमकी ते सर्वसामान्य देत आहे. वाळू वाहतुकीचे हे रिल्स करून टाकत असून यामुळे पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन यांना एक प्रकारे दिलेले आव्हान सर्रासपणे जनता पाहत आहे. वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांना कोणताही नंबर नसून यामुळे पोलिसांनी त्यांच्याबरोबर लागेबंधे ठेवले की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

या घटनेचा सोशल मीडियात आणि पिंपरने परिसरातून मोठा निषेध होत असून याबाबत पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन काय भूमिका घेते आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### अवाज उठविल्यास मिळते धमकी

सर्वसामान्य माणसाकडून चूक झाली तर मोठा दंड केला जातो किंवा त्याला शिक्षा केली जाते. मात्र हे वाळू तस्कर राजरोसपणे तस्करी करत असून रिल्स करून आपली स्वतःची जाहिरात करत आहे. याचबरोबर याविरुद्ध जर कोणी आवाज उठवला तर धमकावले जात आहे.

## जामखेडमध्ये संविधान महोत्सव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर व संविधानिक मूल्यांची जनजागृती करण्याच्या उद्देशाने जामखेड शहरात सालाबादप्रमाणे यंदाही १३ वा संविधान महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

समस्त भिमसैनिक जामखेड तालुका यांच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन सोमवार, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजमंदिर, बाजारतळ, जामखेड येथे करण्यात आले आहे. महोत्सवाची सुरुवात सकाळी १० वाजता 'भव्य संविधान सन्मान मोटरसायकल रॅली' ने होणार आहे. तसेच सकाळी ११ वाजता भारतीय संविधान प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व पुरस्कार वितरण कार्यक्रम पार पडणार आहे. संविधानाच्या मूल्यांचे जतन व प्रसारासाठी योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते विकीभाऊ सदाफुले यांनी दिली आहे.

## सावळीविहीर चौकातील पुलाचे काम रेंगाळले; ग्रामस्थ संतप्त



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : नगर-मनमाड रस्त्यावरील सावळीविहीर चौकात कोट्यवधी रुपये खर्चुन बांधण्यात आलेल्या अर्ध्या किलोमीटर लांबीच्या पुलाचे काम दोन वर्षांपासून रेंगाळले आहे. पुलाचा सांगाडा तयार असूनही एका बाजूचे काम अर्धवट असल्याने वाहतुकीचा खोळंबा होत असून सावळीविहीर ग्रामपंचायतीचे सरपंच ओमेश जपे यांनी या दिरंगाईबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे.

नगर-मनमाड रस्त्यावर सावळीविहीर चौकात शिर्डी, सिन्नर आणि कोपरगाव या मार्गांकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी शासनाने दोन वर्षांपूर्वी पुलाची उभारणी सुरू केली. अवजड वाहनधारकांना सुलभ प्रवास व्हावा आणि वाहतूक कोंडी सुटावी, हा यामागचा मुख्य हेतू होता. मात्र इतका कालावधी उलटूनही या पुलाचे काम पूर्ण झालेले नाही. पुलाच्या एका बाजूचा भराव अद्याप टाकण्यात आलेला नसल्याने पुलावरून वाहतूक सुरू होऊ शकलेली नाही. लगतच्या सर्विस रोडचे काम सध्या हाती घेण्यात आले असले तरी, ते पूर्ण होईल की नाही, अशी शंका सरपंच ओमेश जपे यांनी व्यक्त केली आहे.

### दोन वर्षांपासून केवळ पुलाचा सांगाडा

अहिल्यानगर-मनमाड रस्त्याचे काम पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉक्टर सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काही ठिकाणी जलदगतीने सुरू आहे, मात्र सावळीविहीर चौकातील पुलाकडे दुर्लक्ष होत आहे. या अर्धवट कामामुळे चौकात वारंवार वाहतूक कोंडी होत असून रस्त्यावरील धुळीमुळे वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही पुलाचा केवळ सांगाडाच उभा असल्याने प्रशासकीय दिरंगाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# जमिनीचा मोबदला मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार

## कोपरगाव मतदारसंघाच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांना आमदार काळेंची ग्वाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव मतदारसंघाच्या पूर्व भागातून जाणाऱ्या नांदूर मध्यमेश्वर एक्स्प्रेस कालव्याच्या वितरिका व आणि लघु वितरीकांसाठी तळेगाव मळे आदी गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्या. मात्र खरेदी झालेली नाही. त्यामुळे अद्यापपर्यंत या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळालेला नाही. त्याबाबत या शेतकऱ्यांनी नुकतीच आ. आशुतोष काळे यांची भेट घेवून त्यांच्यापुढे आपली कैफियत मांडली असता जमिनीचा मोबदला मिळवून देण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही आ. आशुतोष काळे यांनी प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना दिली आहे.

कोपरगाव मतदारसंघाच्या पूर्व भागातून जाणाऱ्या नांदूर मध्यमेश्वर एक्स्प्रेस कालव्याच्या वितरिका क्रमांक १ व वितरिका क्रमांक २ च्या वितरिका आणि लघु वितरीकांसाठी २००३ साली तब्बल २२ वर्षापूर्वी तळेगाव मळे गावातील शेतकऱ्यांच्या कालव्याच्या उजव्या बाजूने ६.३१ हेक्टर आर व ७८ आर असे एकूण ७.०९ हेक्टर जमीनी अधिग्रहित करण्यात आलेल्या आहेत. मात्र सदरच्या जमिनीची खरेदी न झाल्यामुळे त्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळालेला नाही. आजवर या शेतकऱ्यांनी अनेक वेळा पत्र व्यवहार व पाठपुरावा केला. परंतु त्यांना जमिनीचा मोबदला मिळालेला नाही.महाराष्ट्र शासनाच्या गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने देखील



राहीलेल्या भू-संपादनासाठी निधी मिळावा, अशी मागणी केलेली आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचे तात्कालीन जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, प्रांताधिकारी माणिकराव आहेर, नांदूर मध्यमेश्वर एक्स्प्रेस कालव्याचे कार्यकारी अभियंता गुजरे यांच्या समवेत बैठक झाली होती. त्या बैठकीत प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या जमिनीचे मुल्यांकन निश्चित करण्यात आले होते.बाधित शेतकऱ्यांच्या जमिनी तीन महिन्याच्या आत सरळ खरेदी करून त्यांच्या मोबदल्याची रक्कम वितरीत करण्याचे आदेशही पाटबंधारे विभागाला माजी जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांनी दिले होते. परंतु अद्यापही शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी झाल्या नाहीत त्यामुळे खात्यात अद्याप मोबदल्याची रक्कम जमा झालेली नाही व शेतकरी मोबदल्यापासून वंचित असल्याचे बाधित

### उपमुख्यमंत्र्यांच्या सहकार्यातून प्रश्न मार्गी लावणार

आ. काळे यांनी सर्व शेतकऱ्यांची सविस्तर माहिती जाणून घेवून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्यातून तुमचा प्रश्न मार्गी लावून जमिनीचा मोबदला लवकरात लवकर मिळवून देणार तसेच धोत्रे, घोयेगाव, तळेगाव आदी गावातील शेतकऱ्यांच्या जमिनींची मोजणी करून जमिनी अधिग्रहीत करण्यासाठी तातडीने कार्यवाही होवून त्यांनाही लवकरात लवकर मोबदला मिळावा, यासाठी पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही आ. काळे यांनी प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना दिली आहे.

शेतकऱ्यांनी आ. काळे यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी कोपरगाव तालुका जिनिंग प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार तसेच प्रकल्पबाधित शेतकरी मंजाहारी टूपके, दिगंबर टूपके, नसीर सय्यद आदी उपस्थित होते.

# तुळापूरमध्ये हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात



### मान्यवरांकडून उपक्रमाचे कौतुक

गटशिक्षणाधिकारी मोहनीराज तुंबारे, शिक्षण विस्तार अधिकारी नंदा गवळी, केंद्रप्रमुख नीलिमा गायकवाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश हारदे, सरपंच दादासाहेब हारदे, माजी सभापती भीमराज हारदे, माधव हारदे, कामगार पोलीस पाटील बाळकृष्ण हारदे, चांगदेव हारदे, सचिन मुसमाडे, अमोल हारदे, शिवा हारदे, मनोज हारदे यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** राहुरी तालुक्यातील तुळापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत हळदी-कुंकू समारंभ उत्साहात पार पडला.

यावेळी राजमाता जिजाऊ माता गट, राणी लक्ष्मीबाई माता गट व कल्पना चावला माता गट या माता गटांचे उद्घाटन करण्यात आले. तसेच माता पालकांना विद्यार्थ्यांचे आरोग्य, आहार, स्वच्छता व सुरक्षा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. दररोजच्या धकाधकीच्या जीवनातून महिलांनी स्वतः साठी वेळ द्यावा व स्वतःचे छंद जोपासत विद्यार्थ्यांचे जीवन फुलवण्यासाठी सदैव तत्पर व जागरूक राहावे.

यासाठी मुख्याध्यापक वैष्णव संतोष यांनी मार्गदर्शन केले. समाजाचा शाळेतील सहभाग वाढवावा, यासाठी आवाहन केले. विविध स्पर्धा परीक्षा व घरचा अभ्यास याबाबत सहशिक्षिका दुबे योगिता यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी महिलांनी संगीत खुर्ची व चमचा लिंबू या स्पर्धांचा मनसोक्त आनंद घेतला. संगीत खुर्ची स्पर्धेत गीता सांगळे तर चमच्या लिंबू स्पर्धेत रेणुका साबळे या विजेत्या ठरल्या. विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# टाकळीभानमध्ये बेशिस्त वाहनांवर कारवाई

## कारवाईनंतर व्यापाऱ्यांसह नागरिकांकडून स्वागत




**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान :** येथे पोलीस निरीक्षक धनवटे यांनी स्वतः रस्त्यावर पोलीस व्हॅन फिरून बाजारकरूंना स्पीकर वरून सूचना केल्या. यावेळी रस्त्यावरील बेशिस्तीने लावलेल्या वाहनांवर कारवाई करण्यात आली.

श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे मोठी बाजारपेठ असून आसपासच्या दहा ते बारा खेडेगावातील नागरिक आठवडे बाजारसाठी टाकळीभान येथे गर्दी करतात. बाजार मोठा असल्याने महाराष्ट्र राज्यमार्ग क्रमांक ५० वर बाजारकरूच्या गाड्या रोडला लावल्या जातात. त्यामुळे वाहतु कोंडी होत असते व गर्दीमुळे अपघाताचे प्रमाण वाढते.

तसेच रोडवरील बेशिस्तीने लावलेल्या वाहनावर कारवाई केली. तसेच हे. कॉ. आयुब शेख, हे. कॉ. विठ्ठल थोरात, पोलीस कर्मचारी यांनी रोडला लावलेली वाहने काढून रस्ता मोकळा केला.

टाकळीभान येथील सोमवार आठवडे बाजारच्या दिवशी पोलीस प्रशासनाने बेशिस्तीने लावलेल्या वाहनांना कारवाईची चपराक दिल्याबद्दल गावातील व्यापारी व नागरिकांनी पोलीस प्रशासनाचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

# ‘मॅट्रिक्स’ ठरला डॉ. घुले पाटील चषकाचा मानकरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा :** येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील क्रिडा प्रबोधिनी आयोजित माजी आमदार नरेंद्र घुले पाटील चषक क्रिकेट स्पर्धेत भेंड्याचा मॅट्रिक्स इंजीनियरिंग संघ माजी आ. नरेंद्र घुले पाटील चषकाचा मानकरी ठरला आहे.



नेवासा तालुक्यातील भेंडा येथील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाचे क्रीडांगणावर दि. १३ ते दि.१८ जानेवारी या कालावधीत माजी आ. घुले पाटील चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा संपन्न झाल्या. दि. १८ रोजी झालेल्या फायनलमध्ये मॅट्रिक्स इंजीनियरिंग भेंडा संघ व हॉटेल पैलवान संघात अतिशय अटीतटीचा अंतिम सामना झाला. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक मॅट्रिक्स इंजीनियरिंग संघाने, द्वितीय हॉटेल पैलवान भेंडा, तृतीय पारितोषिक नेवासा ब्लास्टर तर चतुर्थ पारितोषिक भेंडा बुल्स या संघाने पटकावले. या विजेत्या संघाना रोख पारितोषिक व ट्रॉफी देण्यात आल्या.

क्रीडा प्रबोधिनीचे संस्थापक अशोकराव मिसाळ यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

या स्पर्धा यशस्वीतेसाठी लोकनेते मारुतराव घुले पाटील क्रिडा प्रबोधिनीचे अध्यक्ष किशोर मिसाळ, रविंद्र डौले, नोहिद पटेल, मेहताब सय्यद, आदित्य पुंड, सारंग बोरुडे, शरद भालेराव यांनी परिश्रम घेतले. रवींद्र डौले यांनी सूत्रसंचालन केले. किशोर मिसाळ यांनी आभार मानले.

### दिग्गज मान्यवरांची होती उपस्थिती

ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे कामगार संचालक सुखदेव फुलारी, माजी उपसरपंच दादासाहेब गजरे, रामचंद्र गंगावणे, काविळ उपचार तज्ञ सुनील वाबळे, देवेंद्र काळे, बंडू भागवत, परसराम नाकाडे, सुदाम आरगडे, दिपक वायकर, हिरालाल धनवडे, सुनिल दगडे, यशवंत मिसाळ, स्वप्निल बोधक, अनिल शेरे देवेंद्र काळे, संतीष फुलारी, संतोष साळवे, राम गरड आदी उपस्थित होते.

# ढेरे मळा शाळेत अज्ञातांकडून तोडफोड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील ढेरे मळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये अज्ञात व्यक्तीने पाच वर्ग खोल्यांचे कुलूप तोडून वर्गात प्रवेश करत शैक्षणिक साहित्याची मोठ्या प्रमाणावर तोडफोड केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वापरात असलेला टीव्ही, साऊंड सिस्टिम तसेच शाळेची बोर व कॉम्प्युटर रूमचेही नुकसान करण्यात आले आहे. रविवारी सकाळी शाळेतील छोटी मुले खेळण्यासाठी शाळेच्या मैदानामध्ये आले असताना त्यांना वर्गखोल्या उघड्या दिसल्या. रविवारी असूनही वर्ग खोल्या उघड्या कश्या याची कुतूहल मुलांच्या मनामध्ये निर्माण झाले आणि त्यांनी वर्गामध्ये जाऊन पाहिले असता त्यांना मोडतोड झालेला वर्ग, फोडलेला टीव्ही दिसला त्यानंतर तात्काळ त्यांनी घरी जाऊन आपल्या पालकांना ही माहिती दिली. सर्व पालक शाळेमध्ये आले आणि त्यांनी शिक्षकांना देखील कळवल्यानंतर ते देखील शाळेमध्ये आले.

या प्रकारामुळे नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. शाळेचे शैक्षणिक नुकसान झाल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. श्वानपथकही पाचारण करण्यात आले असून तज्ज्ञांकडून ठसे घेण्यात आले आहे.

### ग्रामस्थांकडून घटनेचा निषेध

दरम्यान, ग्रामस्थांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला असून आरोपीला तात्काळ शोधून कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा विद्यार्थ्यांसह पोलीस ठाण्यावर आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. शिक्षणाच्या मंदिरात घडलेल्या या प्रकारामुळे संपूर्ण परिसरात तीव्र नाराजी व संतापाची भावना पसरली आहे.

# सात्रळमध्ये स्वातंत्र्य, संघर्ष व संस्कारांचा जागर

## कॉ. पी. बी. कडू पाटील-शांताबाई कडू पाटील स्मृतिदिन सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनगाव :** राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील रयत शिक्षण संस्थेच्या रयत संकुलात थोर स्वातंत्र्य सेनानी, माजी आमदार कॉ. पी. बी. कडू पाटील व मातोश्री शांताबाई कडू पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित सोहळा प्रेरणादायी वातावरणात पार पडला. यावेळी स्वातंत्र्य, संघर्ष व संस्कारांचा जागर अनुभवायला मिळाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिनव शिक्षण संस्था, अकोलेचे अध्यक्ष व जिल्हा सहकारी बँकेचे संचालक मधुकर नवले होते. माजी खा. प्रसादराव तनपुरे व अर्जुनराव राजळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी कॉ. पी. बी. कडू पाटील, मातोश्री शांताबाई कडू पाटील व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्वागतगीताने कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात झाली.

रयत संकुलाचे प्राचार्य सिताराम गारुडकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविक करताना स्कूल कमिटी सदस्य किरण कडू यांनी कॉ. पी. बी. कडू पाटील व मातोश्री शांताबाई कडू पाटील यांच्या समाजकारण, शिक्षण व मूल्याधिष्ठित सार्वजनिक जीवनाचा गौरव केला. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा शाल, बुके व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रामदास तांबे व सचिन पलघडमल यांनी केले. तर आभार कॉ. कारभारी उगले यांनी मानले.

> विरोधकाचाही सन्मान राखणारे नेतृत्व हीच आप्पांची खरी ओळख होती. स्वातंत्र्य चळवळीतून समाजकारणात आलेल्या या नेतृत्वाने कष्टकरी व कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून दिला.
>
> **- प्रसाद तनपुरे,**
> माजी खासदार

# फुले विद्यालयाचे रेखाकला परीक्षेत सुयश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटीचे महात्मा फुले विद्यालय सुगांव बु. विद्यालयातील शासकीय रेखाकला परीक्षेचा सन २०२५-२६ इलेमेंटरी व इंटरमीजीएटचा निकाल अत्यंत समाधानकारक लागला असून इंटरमिजीएट या परीक्षेचा निकाल १०० टक्के इतका असल्याने याही वर्षी निकालाची परंपरा कायम ठेवण्यात यश आले आहे.

दरवर्षी महाराष्ट्र शासनाच्यामार्फत शालेय स्तरावर या परिक्षांचे आयोजन करण्यात येत असते व विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने त्यात सहभागी होत असतात. विद्यालयाच्या दोन मुली अनुक्रमे शिंदे सेजल सोपान, देशमुख श्रावणी संजय यांनी या परीक्षेत अ श्रेणी मिळवत शाळेच्या यशाचा वाढता आलेख कायम ठेवण्यात यश मिळवले आहे.

# कांद्याने केला शेतकऱ्यांचा वांदा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** कांदा हे शेतकर्यांचे नगदी पिक. या पिकावरच शेतकऱ्यांचे वर्षेभराचे सर्व आर्थिक व्यवहार व नियोजनही अवलंबून असते. परंतू सध्या शेतकरी व व्यापाऱ्यांकडे असलेला जुना कांदा व नव्याने निघत असलेला पावसाळी कांदा एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर बाजारात येत असल्याने बाजार भाव पडलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढावल्याने कांद्याने केला. शेतकऱ्यांचा वांदा, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सर्वच बाजारपेठ कांद्यावर अवलंबून असल्याने बाजारपेठेत सध्या मोठी मंदी जाणवत आहे. शेतकरी ही कांद्यावरच वर्षभराचे सर्वच आर्थिक व्यवहाराचे नियोजन करतात. पण यंदाच्या पडलेल्या बाजारभावामुळे शेतकऱ्यां पुढे मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

# नेवाशातील गावात भाजपाचे निरीक्षक दाखल

## बूथ प्रमुखांचे भरले फॉर्म; पदाधिकाऱ्यांच्या भेटीने कार्यकर्ते लागले कामाला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाचे राज्य प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार ग्रामीण भागात अचानक भेटी देऊन नेवासा तालुक्यात



तालुका निरीक्षक म्हणून मधुसूदन जाधव यांच्यासह अन्य निरीक्षक राजकीय विश्लेषक चर्चा करत स्थानिक स्वराज्य निवडणूक सोनई गट व समावेश असणाऱ्या लोहोगाव, झापवाडीत दाखल होऊन गुप्त माहिती सकलन करण्याचे पक्ष कार्य सुरु झाल्याने कार्यकर्त्यांनी हजेरी लावण्यासाठी स्पर्धा सुरु केली आहे.निरीक्षक जाधव यांनी बूथ प्रमुख, लोहोगाव, झापवाडी, येथील कार्यकर्ते माजी सरपंच पांडुरंग वाघ, भाजपचे मंडळ अध्यक्ष संभाजी जगताप यांसह बैठक पार पडून बूथ प्रमुखांचे फॉर्म भरून घेण्यात आले. यावेळी माजी सरपंच पांडुरंग वाघ यांनी केलेल्या ग्रामपंचायतच्या माध्यमातून कामाची दखल घेत वाघ यांच्या नावाचा आग्रह करण्यात आला. त्यांच्या कामाची यावेळी माहिती देण्यात आली.

### कार्यकर्त्यांची पडताळणी सुरू?

पक्ष निष्ठा, जनसामान्य पर्यंत शासकीय गोरगरीब योजना, पक्षांदेश, परिसरातील जनसंपर्क, चारित्र्य, सुशिक्षित, काम करण्याची क्षमता, पक्षासाठी कार्यकर्त्यांचा संघ आदी बाबी जाणून घेतल्या. अचानक भेटीने कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहे.



# मुलींनीच केलं लग्न!

बिहारमधील सुपौल जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या या दोन मुली 'सोशल मीडिया'वर भेटल्या. त्यांनी नंबरची देवाणघेवाण केली आणि बोलू लागल्या. एकमेकींच्या प्रेमात पडल्या आणि नंतर लग्न केले.बिहारमधील सुपौल जिल्ह्यातील एका अनोख्या लग्नाची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. या लग्नाबद्दल ऐकून लोक खूप आश्चर्यचकित झाले आहेत. या लग्नाची चर्चा केवळ सुपौलमध्येच नाही, तर आजूबाजूच्या परिसरातही होत आहे आणि त्याचे कारण म्हणजे हे मुलगा आणि मुलीतील लग्न नव्हते, तर दोन मुलींमधील लग्न होते. त्यांनी साक्षीदार म्हणून गॅस स्टोव्हसह सात फेरे घेतले आणि नंतर एका मंदिरात लग्न समारंभ पूर्ण केला.

२१ वर्षीय पूजा आणि १८ वर्षीय आरती प्रेमात पडल्या. त्या इंस्टाग्रामवर भेटल्या आणि नंबरची देवाणघेवाण केली. त्यांनी दोन वर्षांपूर्वी प्रथम बोलणे केले आणि तेव्हापासून त्यांची प्रेमकहाणी सुरू आहे. पूजा आणि आरती म्हणतात,त्यांना मुलांमध्ये रस नाही, म्हणून त्यांनी एकमेकींशी लग्न केले. पूजा आणि आरतीने साक्षीदार म्हणून गॅस स्टोव्हसह सात फेरे घेतले आणि नंतर त्रिवेणीगंज मेळा मैदानावरील मंदिरात लग्न केले.आता लग्न झालेल्या पूजा आणि आरती 'सोशल मीडिया'वर भेटल्या; परंतु त्या दोघीही एकाच मॉलमध्ये काम करत होत्या. हळूहळू त्यांनी एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. पूजा आणि आरती म्हणतात, आम्ही भाड्याच्या खोलीत एकत्र राहू लागलो. त्या म्हणतात, आम्ही जोडप्यासारखे एकत्र राहू लागलो. आमच्या दोघींचीही कुटुंबं या लग्नासाठी अजिबात तयार नव्हती, म्हणून आम्ही आधी लग्न केले आणि नंतर आमचे फोटो 'सोशल मीडिया'वर अपलोड केले.

## कॅलिडोस्कोप

# मांसाहारी प्रसाद?

पूजा अर्चा करताना किंवा उपवास करताना सात्विक आहार घ्यायचा असतो, असे आपण आजवर ऐकले आणि वाचले असेल. परंतु तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल, की भारतातील काही मंदिरात मांसाहारी प्रसाद दिला जातो. भारतात अनेक मंदिरांमध्ये देवीला किंवा ग्रामदैवताला मांसाहार अर्पण केला जातो. या मागे धार्मिक आणि सांस्कृतिक कारणे आहेत.

**✻ मुनियंडी स्वामी मंदिर, तामिळनाडू**

तामिळनाडूतील मदुराई जिल्ह्यातील वडक्कम पट्टी या लहान गावातील मुनियंडी स्वामी मंदिरात भगवान मुनियादी (भगवान शिवाचे अवतार मुनिश्वर नावाने ओळखले जातात) यांची पूजा केली जाते. दरवर्षी येथे तीन दिवसांचा वार्षिक उत्सव साजरा केला जातो. या मंदिरात प्रसाद म्हणून चिकन आणि मटण बिर्याणी दिली जाते. लोक सकाळी बिर्याणी खाण्यासाठी मंदिरात गर्दी करतात.

**✻ विमला मंदिर, ओडिशा**

देवी विमला (दुर्गा मातेचे एक रूप) या देवीला पूजेदरम्यान मांस आणि मासळीचा नैवेद्य दाखवला जातो. हे मंदिर ओडिशाच्या पुरी स्थित जगन्नाथ मंदिर परिसरात आहे आणि यास शक्तीपीठांमध्ये गणले जाते. दुर्गा पूजेत मंदिरातील पवित्र मार्कंडा तलावात मासे पकडले जातात आणि देवीला अर्पण केले जातात. सकाळी आधी बळी दिलेल्या बकऱ्याचे मटण शिजवून देवीला अर्पण केले जाते. हे दोन्ही पदार्थ बळीची प्रक्रिया पाहणाऱ्यांना प्रसाद म्हणून वाटले जातात. भगवान जगन्नाथ यांचे दरवाजे उघडलेले नसतात तेव्हा हे केले जाते.

**✻ टारकुलहा देवी मंदिर, उत्तर प्रदेश**

उत्तर प्रदेशातील गोरखपूरमधील टारकुलगा देवी मंदिरात दरवर्षी खिचडी मेळा भरतो. हे मंदिर लोकांची मनोकामना पूर्ण करण्यासाठी प्रसिद्ध आहे. देशभरातील लोक चैत्र नवरात्रीत येथे येतात. नवस म्हणून देवीला बकऱ्याचा बळी देतात. याचे मांस मातीच्या भांड्यात शिजवले जाते. आणि भक्तांना प्रसाद म्हणून वाटले जाते.

**✻ पारसिनिक कडवु मंदिर, केरळ**

पारसिनिक कडवु मंदिर भगवान मुथप्पन यांना समर्पित आहे. भगवान मुथप्पन हे कलियुगात जन्मले असून, ते विष्णू आणि शिवाचा अवतार मानले जातात. दक्षिण भारतात त्यांना अनेक नावांनी ओळखले जाते आणि त्यांची पूजा केली जाते. येथे प्रसादात भाजलेली मासळी आणि ताडी भगवान मुथप्पन यांना अर्पण केली जाते. असे केल्याने मनोकामना पूर्ण होते, अशी श्रद्धा आहे.



हा प्रसाद नंतर भक्तांना दिला जातो.

**✻कालीघाट, पश्चिम बंगाल**

हा देशातील ५१ शक्तीपीठांपैकी एक आहे आणि २०० वर्षे जुने देवस्थान आहे. येथे बहुतांश भक्त देवी कालीला प्रसन्न करण्यासाठी बकऱ्याचा बळी देता. बळी दिल्यानंतर हे मांस शिजवले जाते आणि भक्तांना प्रसाद म्हणून दिले जाते.

**✻ कामाख्या मंदिर, आसाम**

कामाख्या मंदिर प्रसिद्ध आहे. ते एक प्रसिद्ध शक्तीपीठांपैकी एक आहे. येथे माँ कामाख्या देवीची पूजा तांत्रिक शक्तींसाठी केली जाती. हे मंदिर आसामच्या नीलाचल पर्वतात आहे. नैसर्गिकदृष्ट्या सुंदर प्रांतात आहे. येथे देवीला दोन प्रकारचा नैवेद्य दिला जातो. एक शाकाहारी आणि दुसरा मांसाहारी. हे दोन्ही नैवेद्य विना कांदा-लसूण बनवले जातात. मांसाहारी प्रसादात बकऱ्याचे मटण असते. ज्यास देवीला अर्पण करून नंतर प्रसाद वाटला जातो. कधी माशाची चटणी तयार केली जाते. हा नैवेद्य दुपारी १ ते २ या दरम्याने देवीला चढवला जातो. या वेळी मंदिराचे मुख्यद्वार बंद असते.

**✻ तारापीठ, पश्चिम बंगाल**

पश्चिम बंगालच्या बीरभूम जिल्ह्यातील तारापीठ मंदिर दुर्गा भक्तांमध्ये खूपच प्रसिद्ध आहे. येथेही लोक देवीला मांसाचा नैवेद्य अर्पण करतात. या वेळी देवीला मद्य देखील चढवले जाते. नंतर हा प्रसाद म्हणून लोकांना वाटला जातो.

**✻ दक्षिणेश्वर काली मंदिर, पश्चिम बंगाल**

दक्षिणेश्वर काली मंदिर हे पश्चिम बंगाल येथील एक प्रसिद्ध शक्तिपीठ आहे. या मंदिरात देवीला नैवेद्यात मासळी दिली जाते. नंतर पूजा झाल्यानंतर ही भक्तात वाटली जाते; मात्र या मंदिरात कोणत्याही प्राण्याची बळी दिला जात नाही.

# पायांमुळे होते लाखोंची कमाई

कोणाच्या डोक्यातून कोणती सुपीक कल्पना निघेल याचा नेम नाही. आजच्या जगात कोणाला दोन वेळचं अन्न मिळत नाही तर कोणी अचानक मालामाल होऊन जातो. आता पायात घातलेल्या, दुर्गंधी येणाऱ्या मोज्यांचं आणि बुटांना कोणी विचारेल तरी का? पण एक मुलगी असे दुर्गंधी येणारे बूट आणि मोजे ऑनलाईन विकते आहे. रोक्सी साईक्स असं या महिलेचं नाव आहे. दुर्गंधी येणारे मोजे आणि बूट विकून ती वर्षाला एक लाख पाउंड म्हणजे ७३ लाख रूपये कमावते. एका इंस्टाग्राम पेजवरून या अनोख्या व्यवसायाची सुरूवात झाली. दुर्गंधी येणारे बूट आणि मोजे विकायचा विचार कोणाच्याही मनात येणार नाही. पण रोक्सीला ही कल्पना सुचली. सुंदर पायांमुळे ती हे करू शकली. रोक्सीने इन्स्टाग्राम अकांउट सुरू केलं. पायांवर प्रेम करणारे किती लोक आहेत हे तिला जाणून घ्यायचं होतं. एका महिन्याच्या आत तिला दहा हजारांपेक्षा जास्त फॉलोअर्स मिळाले. मग काही व्यापाऱ्यांनी तिच्याशी संपर्क केला. मोज्यांच्या एका जोडीसाठी २० पाउंड आणि बुटांच्या जोडीसाठी २०० पाउंड देण्याचं ठरलं आणि रोक्सीला मार्ग मिळाला. तिचा व्यवसाय वाढत गेला. रोक्सी महिन्याला ८००० पाउंड कमावते. भारतीय चलनात याचं मूल्य साडेसात लाख रूपये होतं. पायांच्या माध्यमातून कमाईचे मार्ग मिळवण्याचे धडे रोक्सी काही मॉडेल्सना देते आहे. रोक्सीला आता आपल्या भविष्याची अजिबात चिंता नाही.





# जंगल श्वास घेतंय!

झाडं सजीव असतात. तीही श्वास घेतात, ऑक्सिजन बाहेर सोडतात. कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेतात. पण या प्रक्रियेत झाडं श्वासोच्छवास करताना दिसत नाहीत. पण कॅनडाम धल्या सेक्रे कोइर भागतलं जंगल अचानक श्वास घेऊ लागलं. झाडंझुडुपं हलू लागली. हे सगळं एका व्हिडिओमध्ये रेकॉर्ड झालं. हा व्हिडिओ व्हायरल झाला. जंगलाला अशा प्रकारे श्वास घेताना बघून सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. या व्हिडिओमध्ये जंगलाखालची जम ीन हलत असल्याचं दिसून येत आहे. यामुळे झाडं श्वास घेत असल्याचा भास आपल्याला होतो. आता प्रत्यक्षात जंगल अशा प्रकारे श्वास घेऊ शकतं का? तर नाही. मग काय घडलं असावं? हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शास्त्रज्ञांची टीम या ठिकाणी रवाना झाली. त्यांनी शोध घेतला. त्यांच्या असं लक्षात आलं की सोसाट्याच्या वाऱ्यामुळे जंगल श्वास घेत असल्याचा भास होत आहे. सोसाट्याचा वारा सुटल्यानंतर झाडाचा वरचा भाग हलू लागला. सोसाट्याचा वारा सुटल्यावर पृथ्वीवरची माती नरम पडते. झाडांची मुळं मातीशी घट्ट जोडलेली असतात. पण वाऱ्यामुळे माती नरम पडल्यामुळे मुळं थोडी कमकुवत होतात. वारा सुटल्यानंतर खोड, बुंदे, फांद्या, पानं सगळं जोरात हलू लागतं. त्यामुळे जंगल श्वास घेत असल्याचा भास होतो, असा खुलासा शास्त्रज्ञांनी केला आहे. सोशल मि डियावर कोणता व्हिडिओ व्हायरल होईल याचा नेम नसतो. पण जंगल श्वास घेत असल्याच्या या व्हिडिओने सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का दिला.



# ...मग होतो 'डिजिटल ब्लॅकाऊट'!

बेळगाव जिल्ह्यातील हलगा गावाने डिजिटल युगात एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. दररोज संध्याकाळी ठीक सात वाजता ग्राम पंचायत कार्यालयातून सायरन वाजतो आणि संपूर्ण गाव दोन तासांसाठी 'डिजिटल ब्लॅकआउट'मध्ये बुडते. टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप, टॅब्लेट सर्व स्क्रीन्स बंद होतात. रात्री नऊ वाजता दुसरा सायरन वाजतो आणि जीवन पुन्हा सामान्य होते.

ही मोहीम विशेषतः मुलांच्या शिक्षणासाठी आहे.'एसएसएलसी' परीक्षा आणि अभ्यासाच्या तयारीत मुले मोबाईल-टीव्हीच्या व्यसनामुळे विचलित होतात. आता हे दोन तास मुले पूर्ण एकाग्रतेने अभ्यास करतात. काही मुले ग्रुप स्टडी करतात, तर काही घरातील कामात मदत करतात. पालकही मुलांना साथ देतात. स्वतःही स्क्रीनपासून दूर राहतात.

गावातील महिलाही उत्साहाने सहभागी होताक. पूर्वी संध्याकाळी टीव्ही मालिका पाहण्यात वेळ जात होता. आता त्या कुटुंबाशी बोलतात, घरात गप्पा मारतात किंवा इतर कामे करतात. स्थानिक रहिवासी रोहित यल्लुरकर म्हणतात, या दोन तासांमुळे मुलांची एकाग्रता वाढली आहे. अभ्यासात खूप फरक पडतो आहे. ही कल्पना म हाराष्ट्रातील मोहित्यांचे वडगाव गावातील यशस्वी मोहिमेपासून प्रेरित आहे. तिथेही असाच सायरन आणि डिजिटल बंदीचा नियम आहे. हलग्यातील ग्रामस्थांनी हे पाऊल उचलून मुलांचे भविष्य उज्ज्वल करण्याचा निर्धार केला आहे.

जास्त स्क्रीन टाइम मुलांसाठी धोकादायक आहे. शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी हा उपक्रम गरजेचा होता. गावकऱ्यांचा हा स्वेच्छेचा निर्णय पूर्ण गावाने अवलंबला आहे. आता संध्याकाळी गावात शांतता आणि अभ्यासाचे वातावरण असते. कुटुंबे एकत्र येतात, गप्पा मारतात. हा उपक्रम इतर गावांना आणि शहरांना प्रेरणा देत आहे. डिजिटल व्यसनावर मात करण्याचा हा सोपा पण प्रभावी मार्ग खरोखरच कौतुकास्पद आहे.

# घरात चूलच नाही?

शेकडो सालापासून भारतीय गावे त्यांच्या साधेपणासाठी आणि परंपरासाठी ओळखले जातात,परंतु आताकाळ बदलत आहे. सोयी-सुविधा वाढल्या आहेत. आजही काही गावांमध्ये अनोख्या परंपरा सर्वांचे लक्ष आकर्षित करतात. असे एक गाव गुजरातमध्येही आहे. या गावातील कोणत्याही घरात चूल नाही, तरी सर्वजण एकत्र बसून जेवतात आणि कोणीही उपाशी राहत नाहीत.

या गावाचे नाव चंदंकी असे आहे. सुमारे १००० लोकसंख्येच्या या गावात सामुदायिक स्वयंपाकघराची अनोखी परंपरा चालत आली आहे. या संपूर्ण गावात जेवण रोज एकाच जागी तयार केले जाते. सर्व गावकरी एकत्र येऊन जेवतात. ही व्यवस्था केवळ जेवणापर्यंत मर्यादित नाही. तर गावच्या एकता आणि सामाजिक सद्भावाचे एक प्रतिक आहे. गावातील एका ज्येष्ठ व्यक्तीच्या मते, अनेक वर्षांपूर्वी गावातील तरुण नोकरी आणि पोटापाण्याच्या निमित्ताने शहरात आणि परदेशात जाऊन राहू लागलेतेव्हा गावातील म्हाताऱ्या लोकांची संख्या वाढली. यामुळे एकत्र येऊन जेवण तयार करणे आणि एकत्र पंगतीला बसणे सुरु झाले. बऱ्याच काळानंतर ही परंपरा कायम सुरूच ठेवण्यात आली आहे. आज ही या गावाची ओळख बनली आहे.

गावातले सुमारे १०० नागरिक रोज जेवण शिजवण्याची जबाबदारी वाटून घेतात. त्यामुळे कोणावर ओझे पडत नाही. डाळ, भाज्या, पोळ्या सर्वजण एकत्र येऊन तयार करतात. तसेच सणासुदीला आणि खास निमित्ताने वेगवेगळी पक्वानेदेखील तयार केली जातात. येथे कोणी एकटे नाही. चंदंकीचे सामूहिक किचन आता पर्यटकांसाठीदेखील एक आकर्षणाचे केंद्र बनले आहे. येथे येणारे पाहुणे केवळ जेवणाचाच नव्हे तर गावातील संस्कृती, एकता आणि एकजुटीचाही अनुभव घेतात. चंदंकी गावातील लोकांच्या मते, येथे कोणी एकटे नाही. एकमेकांच्या सुख आणि दु:खात साथ देण्याची परंपरा पाळत या संपूर्ण गावाने गावालाच एका कुटुंबात बांधले आहे.



# पकडून लावले लग्न!

बिहारमधील भागलपूर जिल्ह्यात एका जोडप्याला चोरून-लपून भेटताना गावकऱ्यांनी पकडले आणि त्यांना लग्न करण्यास भाग पाडले. हे जोडपे गेल्या पाच महिन्यांपासून रिलेशनशिपमध्ये होते आणि प्रेयसीने प्रियकराला रात्री भेटण्यासाठी आमंत्रित केले होते. गावकऱ्यांना या भेटीची कल्पना आली. त्यांनी दोघांना एकत्र असताना पकडले आणि नंतर त्यांचे लग्न लावले.

ही घटना कहलगाव पोलिस ठाणे परिसरातील शिवनारायणपूर अंतर्गत येणाऱ्या ज्योतिपूर गावात घडली. मुलीने मुलाला रात्री भेटण्यासाठी आमंत्रित केले होते. गावकऱ्यांना त्यांच्या भेटीची माहिती मिळाली. त्यांनी त्यांना एकत्र पकडले आणि नंतर त्यांना एका खोलीत बंद केले. गर्दी जमली आणि परिस्थिती आणखी बिकट झाली. अखेर गावकऱ्यांनी जोडप्याचे हिंदू रितीरिवाजांनुसार लग्न लावून दिले. लग्नापूर्वीमुलगा, मुलगी आणि दोन्ही बाजूंच्या कुटुंबातील सदस्यांना आमंत्रित करण्यात आले होते. नंतर लग्न समारंभपूर्वक पार पडले. मुलगा सुरुवातीला लग्न करण्यास नाखूष होता परंतु सार्वजनिक दबावानंतर त्याने होकार दिला. नंतर त्याच रात्रीदोघांचे मंदिरात लग्न लावण्यात आले. प्रियकर राजीव कुमारने सांगितले, तो आणि पूजा गेल्या पाच महिन्यांपासून रिलेशनशिपमध्ये होते. कॉलेजला जाताना त्यांची भेट झाली होती.



# एकच गर्भ वाढला दोन गर्भाशयांत

देवकीने कृष्णाला जन्म दिला. पण यशोदेने त्याला आईचं प्रेम दिलं. त्यामुळे भारतात देवकी आणि यशोदा ही संकल्पना आहे. एका आईने पोटात वाढवलेल्या बाळाला दुसरी आई यशोदा बनून प्रेम देते. पण अमेरिकेत विज्ञानाच्या मदतीने चमत्कार घडला आहे. इथे दोन आयांनी एकच गर्भ आपल्या पोटात वाढवला आणि बाळाला जन्म दिला. हे इथल्या समलैंगिक जोडप्याचं बाळ आहे. दोन महिलांच्या गर्भात वाढलेलं हे जगातलं पहिलंच बाळ आहे. त्यामुळे ही घटना ऐतिहासिक मानली जात आहे. आयव्हीएफ तंत्रज्ञानाच्या मदतीने या जोडप्याने बाळाला जन्म दिला. कल्पनातीत वाटणारी ही घटना प्रत्यक्षात आणण्यासाठी अमेरिकेतल्या डॉक्टरांनी खूप मेहनत घेतली. या जोडप्यातल्या एका महिलेच्या अंडाणूंचं शूक्राणूदात्याच्या शूक्राणूंसोबत प्रयोगशाळेत मिलन घडवण्यात आलं. यानंतर हे भ्रूण या जोडप्यातल्या एका महिलेच्या गर्भात सोडण्यात आलं. काही काळानंतर हे भ्रूण दुसऱ्या महिलेल्या गर्भात सोडण्यात आलं. त्यानंतर या महिलेने बाळाला जन्म दिला. अ‍ॅश्ले आणि ब्लिस कॉल्टर असं या पालक जोडप्याचं नाव आहे. २०१५ मध्ये त्या दोघी विवाहबद्ध झाल्या. या दोन्ही महिलांना स्वत:चं पोटचं बाळ हवं होतं. पण समलैंगिक असल्याने ते शक्य नव्हतं. त्यामुळे त्यांनी आयव्हीएफ तंत्रज्ञानाची मदत घेतली. ३६ वर्षांच्या ब्लिसने आपले अंडाणू दिले. शूक्राणूंसोबत फलन झाल्यानंतर गर्भ ब्लिसच्या गर्भात सोडण्यात आला. काही काळानंतर २८ वर्षांच्या अ‍ॅश्लेच्या गर्भात हेच भ्रूण सोडण्यात आलं. या वर्षी जून महिन्यात त्यांनी मुलाला जन्म दिला. स्टेटसन असं या मुलाचं नाव आहे. या प्रक्रियेसाठी ८५०० डॉलर्स गइतका खर्च आला. तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे या दोन्ही महिलांना पोटात बाळ वाढवण्याचं सुख मिळालं.



दैनिक
# जनता आवाज

अहिल्यानगर, बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ पान नं.८

# लोकप्रतिनिधींच्या उत्तरदायित्वाची भावना सशक्त लोकशाहीचा पाया

## अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत प्रा. राम शिंदे यांचे प्रतिपादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : लोकप्रतिनिधींचे जनतेप्रती उत्तरदायित्व ही केवळ नैतिक अपेक्षा नसून, सशक्त आणि गतिमान लोकशाहीसाठीची एक अनिवार्य कार्यात्मक गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे मसभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

लखनौ येथे आयोजित ८६व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेच्या व्यासपीठावर ते बोलत होते. परिषदेच्या ''जनतेप्रति विधिमंडळांचे उत्तरदायित्व'' या विषयावर आपले विचार मांडतांना सभापती प्रा. शिंदे म्हणाले की, लोकप्रतिनिधी आणि लोकशाही संस्थांची अधिमान्यता केवळ निवडणुकीद्वारे मिळत नाही, तर सातत्यपूर्ण पारदर्शकता, नैतिक आचरण आणि जनतेच्या आकांक्षांप्रती संवेदनशीलतेतून ती दृढ होत जाते.



भारतीय संविधानिक व सांस्कृतिक परंपरेत रुजलेली उत्तरदायित्वाची संकल्पना महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेचा संदर्भ देताना प्रा. शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी स्वराज्य' संकल्पनेचा उल्लेख केला, ज्यामध्ये प्रजेचे कल्याण हे राज्यकारभाराच्या (लोककल्याणकारी राज्य) केंद्रस्थानी होते. तसेच महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विचारांचा संदर्भ देत, लोकप्रतिनिधी हे केवळ निवडून आलेले पदाधिकारी नसून, जनतेच्या आकांक्षांचे विश्वस्त असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

''उत्तरदायित्व ही निवडणुकीपुरती, पाच वर्षांतून एकदा येणारी औपचारिक प्रक्रिया नाही. ती प्रत्येक तासाची, प्रत्येक क्षणाची सततची जबाबदारी आहे,'' असे सांगत त्यांनी विधिमंडळांतील बेशिस्त आणि गोंधळ यामुळे जनतेचा विश्वास डळमळीत होतो, असा इशारा दिला.

प्रा. शिंदे यांनी सांगितले की, विधिमंडळे ही 'जनतेच्या आकांक्षांची मंदिरे' आहेत आणि लोकशाहीची ताकद सभागृहातील चर्चेची गुणवत्ता व उत्तरदायित्वात प्रतिबिंबित होते.

### डिजिटलमुळे आमुलाग्र बदल

डिजिटल पारदर्शकता व ई-विधान उपक्रम तंत्रज्ञानामुळे लोकप्रतिनिधी आणि नागरिकांमधील नाते आमूलाग्र बदलले असल्याचे सांगत, प्रा. शिंदे यांनी ई-विधान आणि महाराष्ट्राने दोन दशकांपूर्वीच सुरू केलेल्या विधिमंडळ डिजिटायझेशनचा उल्लेख केला. सभागृहातील कामकाज, प्रश्नोत्तरे, उपस्थिती आणि चर्चा, कार्यवृत्ताचे संदर्भ वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे पारदर्शकता अधिक बळकट झाल्याचे त्यांनी नमूद केले.

# दरोडी येथे हजरत पीर बाबांचा संदल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : राज्यात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक, श्रद्धास्थान व जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या दरोडी येथील हजरत पीर शेख बहाऊद्दिन चिश्ती रहे यांच्या समाधी दिनानिमित्त शनिवार दि. २४ रोजी संदलचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शेख बहाऊद्दीन चिश्ती ट्रस्टचे मुख्य विश्वस्त अन्वर शेख यांनी दिली.



बाबांनी घेतलेल्या समाधीचा हा दिवस म्हणजे उर्दू कॅलेंडरनुसार चार शाबान आहे. दरवर्षी हा दिवस दरोडी येथे दर्गाहाचा संदल म्हणून साजरा केला जातो. संदलसाठी राज्य व परराज्यातून लाखो भाविक मोठ्या भक्ती भावाने बाबांच्या दर्शनासाठी हजेरी लावत असतात. भाविकांसाठी पाणी, दर्शन व्यवस्था, स्वच्छता, पार्किंगची व्यवस्था ट्रस्टच्या संपूर्ण नियोजन करण्यात येत असते. त्याच्या नियोजनासाठी स्थानिक पुजारी, ग्रामस्थ यांचे विशेष सहकार्य असते.

शनिवार दि. २४ रोजी सायंकाळी ५ वाजल्यापासून कार्यक्रमाला प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे. संध्याकाळी ७ वाजता महाप्रसाद, रात्री ९ वाजता पालखी मिरवणूक, रात्री १२ वाजता संदल होणार आहे. या संदलचा मान दरोडी येथील पावडे परिवाराला दिला जातो, रात्री १२ वाजल्यानंतर महफिल ए सभा होईल. दुसऱ्या दिवशी रविवार दि. २५ रोजी सकाळी ७ नंतर जियारत व सर्वांसाठी प्रार्थना होईल, अशी माहिती ही विश्वस्त अन्वर शेख मुजावर यांनी दिली.

# सावळीविहीर येथे धर्मनाथ बीज साजरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील सावळीविहीर येथे धर्मनाथ बीज विविध धार्मिक कार्यक्रमांनी व मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.सावळीविहीर येथे धर्मनाथ बीजेनिमित्त श्रीदत्त मंदिरात धार्मिक कार्यक्रम करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही तालुक्यातील सावळीविहीर बुद्रुक गावामध्ये असणाऱ्या श्री बाबांनाथ मठामध्ये धर्मनाथ बीज साजरी करण्यात आली.



येथे नवनाथ ग्रंथामधील ३४ वा अध्याय बेबीताई सोनवणे यांनी वाचून श्रींचे पूजन व आरती करण्यात आली. तसेच येथील महिला भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम करण्यात आला. श्री नवनाथ स्वरूप नऊ लहान मुलांचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करत महाप्रसाद देण्यात आला. सावळीविहीर बु.चे प्रथम सरपंच कै.भाऊसाहेब पाटील जपे, कै. विठ्ठल गडकरी, श्री. कैलास जपे आदींनी सुरू केलेला हा धर्मनाथ बीज उत्सव दरवर्षी येथे साजरा करण्यात येतो. या धर्मनाथ बीज कार्यक्रमासाठी बेबीताई सोनवणे, नानी दहिवाळ, पद्माताई कापसे, कामठे मावशी, गायकवाड, जपे मावशी, आदी महिला भजनी मंडळातील महिलांनी परिश्रम घेतले.

# श्रीसाईबाबा इंग्लिश मिडियम स्कूलचे यश

## विज्ञान-गणित प्रदर्शन; 'ग्रीन एनर्जी' उपकरणला द्वितीय क्रमांक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल, शिर्डी (प्राथमिक विभाग) यांनी जिल्हास्तरीय विज्ञान-गणित प्रदर्शनात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

जिल्हा परिषद अहिल्यानगर, पंचायत समिती अकोले व विज्ञान-गणित अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान-गणित व पर्यावरण प्रदर्शन (सन २०२५२६) हे श्री नागेश विद्यालय, जामखेड येथे संपन्न झाले. या प्रदर्शनात अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे २३४ उपकरणे सहभागी झाली होती.

या स्पर्धेत श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल, शिर्डीच्या प्राथमिक विभागातील इयत्ता सहावीचा विद्यार्थी साई विलास सिनगर याने 'ग्रीन एनर्जी' या विषयावर आधारित उपकरण सादर करून विज्ञान-गणित प्रदर्शनात द्वितीय क्रमांक पटकावला असून त्याची नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान-गणित प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.



प्रदर्शनाचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ ना. राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, अहिल्यानगर यांच्या शुभहस्ते पार पडला.

### यांनी केले विद्यार्थ्यांचे कौतुक

या यशाबद्दल विद्यार्थी साई विलास सिनगर व संबंधित शिक्षकांचे संस्थांनच्या अध्यक्षा न्या. अंजू शेंडे-सोनटक्के, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी अतुल वाघ, मुख्याध्यापिका शिल्पा पुजारी, प्राचार्य आसिफ तांबोळी, राहता गटशिक्षणाधिकारी राजेश पावसे यांनी अभिनंदन केले आहे.

# 'यशोरंग' कलाविष्कार सोहळ्याचा शुभारंभ!

## श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : मुळा एज्युकेशन सोसायटीच्या नेवासे येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या 'यशोरंग कलाविष्कार सोहळा २०२६' चा शुभारंभ काल महाविद्यालयांतर्गत क्रीडा स्पर्धांच्या उद्घाटनाने मोठ्या उत्साहात व जल्लोषात झाला. या सोहळ्यात विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयन गडाख यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या सोहळ्याचा शुभारंभ नेवासे निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार प्रशांत गोसावी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाचे सभापती नगरसेवक जितेंद्र कुऱ्हे, उत्सव प्रमुख डॉ. संजय घनवट, उपप्राचार्या राधाताई मोटे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. वंदना आरक, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. सुनील गर्जे, कार्यालयीन अधीक्षक बाबासाहेब माळी, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मी कांगुणे, एनसीसी विभाग प्रमुख डॉ. सुभाष आगळे, डॉ. रेणुका सरगय्ये यांच्या उपस्थितीत महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांना प्रारंभ झाला.



'यशोरंग कलाविष्कार सोहळ्या'त दिनांक २० ते २४ जानेवारी या कालावधीत क्रीडा स्पर्धा, रांगोळी, चित्रकला, केशभूषा, आनंदमेळा, फनी गेम्स, पारंपारिक वेशभूषा तसेच विविध गुणदर्शन (सांस्कृतिक कार्यक्रम) अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. २४ जानेवारी रोजी सकाळी वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. अरुण घनवट, उत्सव प्रमुख प्रा. डॉ. संजय घनवट व कार्याध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मी कांगुणे यांनी दिली.

# मोरगेवस्तीवर बिबट्या जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शहरातील मोरगे वस्ती परिसरात आज पहाटे भक्षाच्या शोधात आलेला बिबट्या वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद झाला आहे. मोरगेवस्ती येथील विशाल दुपाटी यांच्या घराजवळ लावलेल्या पिंजऱ्यात हा बिबट्या अडकला.



पहाटेच्या सुमारास पिंजऱ्याजवळ हालचाल दिसून आल्याने शेजारील नागरिकांनी त्या ठिकाणी धाव घेतली असता बिबट्या पिंजऱ्यात अडकलेला असल्याचे निदर्शनास आले. याची माहिती तात्काळ वन विभागाला देण्यात आली. माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन बिबट्याला सुरक्षितरित्या ताब्यात घेतले. या कारवाई दरम्यान वनरक्षक अक्षय बडे, विलास डगळे, राहुल कानडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच प्राणी मित्र बंडू खेमनर यांनी सदर बिबट्या सुमारे अडीच वर्षांची मादी असल्याची माहिती दिली.

विशेष म्हणजे मोरगे वस्ती परिसरात यापूर्वीही दोन बिबटे जेरबंद झाले होते. दिवसेंदिवस कमी होत जाणारी जंगल क्षेत्रे व वाढत चाललेली नागरीवस्ती यामुळे भक्षाच्या शोधात बिबटे मानवी वस्तीकडे येत असल्याचे पुन्हा एकदा या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

# युरिया खतासाठी शेतकऱ्यांची पिळवणूक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : युरिया खतासाठी व्यावसायिकांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक तात्काळ थांबवा, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे तालुका सरचिटणीस नंदलाल काळदाते यांनी केली आहे.

कर्जत तालुक्यात सध्या शेतकऱ्यांना अत्यावश्यक असलेल्या युरिया खताचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून, याचा गैरफायदा घेत काही कृषी दुकानदारांकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात अडवणूक होत असल्याचा गंभीर आरोप भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भाजप कर्जत तालुका शाखेच्या वतीने तालुका कृषी अधिकारी नंदकुमार वाणी यांना निवेदन दिले.

> कोणत्याही कृषी दुकानदाराने युरियासाठी शेतकऱ्यांची अडवणूक करू नये. शासनाच्या दराप्रमाणे शेतकऱ्यांना युरिया द्यावा तसेच त्यासाठी इतर कुठलेही खते बळजबरीने देऊ नयेत. किंवा युरिया नाही असे म्हणून शेतकऱ्यांना परत पाठवू नका. असे परिपत्रक काढली असून शेतकऱ्यांनी अडवणूक झाल्यास संबंधित दुकानदाराविषयी नावासह तक्रार करावी.
>
> **-नंदकुमार वाणी,**
> तालुका कृषी अधिकारी.

यावेळी ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब सोनमाळी, तालुकाध्यक्ष अनिल गदादे, तालुका सरचिटणीस नंदलाल काळदाते, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्रीहर्ष शेवाळे, किसान आघाडीचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय नलवडे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष निळकंठ शेळके व सरचिटणीस स्वप्निल तोरडमल यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



भाजपचे तालुका सरचिटणीस नंदलाल काळदाते यांनी यावेळी बोलताना सांगितले की, ''कर्जत तालुक्यात युरिया खतासाठी शेतकऱ्यांना कृषी सेवा केंद्रांवर चकरा माराव्या लागत आहेत. अनेक ठिकाणी 'युरिया नाही' असे सांगून शेतकऱ्यांना परत पाठवले जात आहे.

# चिखलीत महिलेने घेतला गळफास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : तालुक्यातील बेलवंडी पोलीस स्टेशनच्या हद्दीततील चिखली घाटातील वनविभागाच्या मोकळ्या जागेत लिंबाच्या झाडाला अंदाजे ४० ते ४५ वर्षाच्या महिलेने गळफास घेतला आहे. याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सदर महिलेचा रंग गोरा असून उंची अंदाजे पाच फूट, चेहरा गोल आहे. मयताच्या अंगात गुलाबी रंगाची साडी, गुलाबी रंगाचे ब्लाऊज, गळ्यात तुळशीची माळ आहे. ही मयत महिला तीन ते चार दिवसांपासून चिखली रोडवर फिरत असताना अनेकांनी पाहिले आहे.

# निघोजमध्ये बिबट्या कैद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : निघोजच्या मुका मळा परिसरातील वरखडे, लामखडे वस्तीवर लावलेल्या पिंजऱ्यात एक बिबट्या कैद झाला आहे. दुसऱ्या वास्तव्य कायम आहे.



मंगळवारी येथील युवकांनी दुसरी कडील पिंजरा मुका मळा येथे आणून ठेवला असता, त्यात अलगद जेरबंद झाला. मात्र दुसरा सोबती पळून गेला. त्यामुळे परिसरातील शेतकरी भीतीच्या छायेखाली आले असून दिवसभर शेती कामे करून अंधार पडण्याच्या आधीच शेतकरी वर्ग घरी दाखल होतात. या बिबट्याने नुकतीच ग्रामपंचायतचे माजी सदस्य पोपटराव लामखडे यांच्या कालवडीवर हल्ला करून ती फस्त केल्याने या परिसरात बिबट्याची दहशत मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. रात्र होताच बिबट्याच्या या जोडीने वरखडे वस्तीवर येऊन कोंबड्या, कुत्री, शेळ्या, कालवडी फस्त करण्याचे काम सुरू केल्याने या परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पकडलेला या बिबटयाचे साधारणतः दोन वर्षे वय आहे तर फरार झालेला बिबट्या मात्र त्याच्यापेक्षा मोठा आहे. या दुसऱ्या बिबट्याला लवकरात लवकर जेरबंद करावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# कालभैरवनाथ तीर्थक्षेत्राची विकासाकडे वाटचाल

## बहिरवाडी रस्त्याचे स्वामी प्रकाशानंदगिरी यांच्या हस्ते भूमिपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कौठा** : नेवासा बुद्रुक ते बहिरवाडी,बहिरवाडी ते भालगाव या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ देवगड संस्थानंचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशनंदगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. या रस्त्यामुळे कालभैरव तिर्थक्षेत्राची विकासाकडे वाटचाल सुरू झाली आहे.

आमदार विठ्ठलराव लंघे, नगराध्यक्ष डॉ. करणसिंग घुले, अॅड. अनिल मारकळी, प्रभाकर बोरकर, अनिल बोरकर, विजय महाराज पवार, रामनाथ महाराज पवार, लक्ष्मण महाराज नांगरे, बहिरवाडी देवस्थानचे अध्यक्ष अशोक कोलते, विश्वस्त सिताराम घोरपडे ,बाबासाहेब वाखुरे, माजी सरपंच नंदकुमार वाखुरे, माजी सरपंच सुनील हारदे, अशोक नांगरे, ज्ञानेश्वर पेचे,भाऊसाहेब वाघ, प्रताप चिंधे, राजेंद्र मते, भारतीताई बेद्रे, बहिरवाडीचे सरपंच आनंद नांगरे या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

स्वामी प्रकाशनंदगिरी महाराज म्हणाले की, रस्त्याचे काम सुरु झाले कालभैरवनाथ भक्तांच्या दृष्टीने अतिशय आनंदाची गोष्ट आहे. गुरुवर्य भास्करगिरी बाबांनी नेते मंडळीं, ग्रामस्थांना विश्वस्तांना सांगितले होते की रस्त्याचे काम मार्गी लागणे नितांत गरजेचं आहे. देवस्थानचा विकास दळणवळणावर अवलंबून असतो त्यासाठी रस्ते चांगले असले पाहिजे.

> अनेक दिवसाच्या निधीच्या प्रतिशत असलेले सर्व प्रलंबित कामे प्रथमदर्शनी मार्गी लावणार आहे. लवकरच श्री क्षेत्र देवगड प्रवरा नदीवरील तेरा गावांना जोडणारा २.५ कोटी चा पादचारी पुलाचे भूमिपूजनही करणार आहे.
>
> **-विठ्ठलराव लंघे,**
> विधानसभा सदस्य,




आमदार लंघे म्हणाले की, लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हे मंदिर आहे त्याला जाण्या येण्याच्या रस्त्याचे काम रखडले होते. ते आज सुरु होत आहे. रस्त्याचे काम व्हावे हि बाबांची ईच्छा आहे. आपला तालुका साधु संताच्या पदस्पर्शाने पुनीत झालेला आहे. ज्यावेळेस देवस्थानला दळणवळणाची सुविधा होते. त्यावेळेस भाविकांचा ओघ वाढतो.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11